


जानेवारी २०१५

॥ साई अनंता ॥

# अंतरंग

१. संपादकीय ........ २

२. नववर्ष संदेश ........ ३

३ नानासाहेब चांदोरकरांस नैतिक धडे ........ ६

४. साईबाबांचे हेमाडपंत ........ १३

५. एकनाथी भागवत (अध्यायानुरुप भावार्थ परिचय - अध्याय १६, १७, १८, १९) ........ १८

६. मला विचाराल तर ........ २७

७. प.पू. श्री. वासुदेवानंद सरस्वतीरचित वैशिष्ट्यपूर्ण स्तोत्रे ........ २९

**Printed and Published by** Mr. Anilkumar Dixit residing at ‘Anil’, Hanuman Road, Paranjape "B" Scheme, Road. No. 1, Vile Parle (East), Mumbai- 400057
**Published at** Shri Kakasaheb Dixit Trust of Shree Saibaba, ‘Anil’, Hanuman Road, Paranjape "B" Scheme, Road. No. 1, Vile Parle (East), Mumbai- 400057 for Shri Kakasaheb Dixit Trust of Shree Saibaba.
**Edited by** Mrs. Sneha Vinayak Damle residing at 304, Gorai-Sukh Sagar Society, Plot No. 19/41, Rajyog Marg, Opp. Maratha Sahakari Bank, Gorai, Borivali (West), Mumbai-400 092.
**Printed at** Siddhi Offset Pvt. Ltd., 5/12, Kamat Industrial Estate, 396, V. S. Marg, Prabhadevi, Mumbai - 400025

या अंकात प्रसिद्ध झालेली मते त्या लेखकांची स्वतंत्र मते असून
त्या मतांशी ट्रस्ट, संपादक वा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

सर्वप्रथम सन २०१५ या नवीन वर्षासाठी सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा! क्रमश: सुरू असलेल्या 'एकनाथी भागवत परिचय' या लेख मालिकेत या वेळच्या अध्यायात हिंदू धर्मातील वर्णाश्रमव्यवस्थेचा विषय आहे. नाथांनी त्याचे बरेच विस्तृत वर्णन दिले असले तरी त्याचा संक्षिप्त भागच इथे दिला आहे.

समाजातील विविध माणसांचे अंगभूत स्वभाव व क्षमता यांच्या पायावर मूळ वर्णव्यवस्थेची रचना झाली असे दिसते. प्रत्येकाने आपापल्या वर्णाप्रमाणे आचरण करणे म्हणजे स्वधर्मपालन असे म्हटले जाई व त्यामुळे समाजव्यवस्थेचा गाडा सुरळीत राहील अशी अपेक्षा असे. यात पुढे विविध कारणांमुळे दोष उत्पन्न होऊन त्यास विकृत स्वरूप प्राप्त झाले आणि आज ही व्यवस्था टीकेची धनी व कालबाह्य ठरली आहे. मात्र आजच्या काळात प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे स्वभावधर्माला अनुसरूनच जे योग्य ते काम करावे, सचोटीने निभवावे. एखादा व्यवसाय प्रतिष्ठेचा वा मानाचा म्हणून कुवत व क्षमता नसतानाही त्याचा अंगिकार करू नये. यालाच स्वधर्मपालन असे म्हणता येईल. याच विवेचनेत पुढे आलेला विषय म्हणजे कोणत्याही वर्णाच्या माणसाने कोणते गुण अंगी बाणवावे व कोणते अवगुण अवश्य सोडावे हा भाग मात्र स्वीकारार्ह असाच आहे.

नाथांनी प्रत्येक वेळी सद्गुरुंचे वर्णन करतेवेळी वेगवेगळी रूपके वापरली आहेत. इथे त्यांनी गुरुकृपेस शारदेचा वरदहस्त म्हटले आहे. गुरुकृपेने शिष्याच्या ठिकाणी शब्दब्रह्माची प्रतिभा बहरते असे नाथ म्हणतात. याच अंकातील साईचरित्रकार हेमाडपंतांचे उदाहरण पाहिले तर याची सत्यता पटते. साईचरित्राच्या ९००० ओव्या रचणारे हेमाडपंत हे काही आधीपासूनचा व्यासंग असणारे कवी नव्हते. या रचनेआधी कधी एक ओवीसुद्धा त्यांनी रचली नव्हती. असे असताना मराठी भाषेतील विविध शब्दालंकार, काव्यालंकार यांची रेलचेल असलेली अप्रतिम काव्यस्फूर्ती हे सद्गुरु श्रीबाबांच्या कृपाशीर्वादाचेच फळ नाही तर काय? अशाच स्तिमित करणाऱ्या अलौकिक प्रतिभेची प्रचिती या अंकातील पूज्य श्री टेंब्येस्वामींच्या रचना वाचतानाही नक्कीच येईल.

आपल्या सर्वांच्याच जीवनात, आपणही कधी कधी काही उल्लेखनीय, कौतुकास्पद गोष्टी करत असतो; किंबहुना आपल्या हातून अशा गोष्टी घडत असतात. अशा प्रत्येक वेळी त्यामागील सद्गुरुकृपेची जाणीव जागवण्याचा प्रयत्न करणे भक्तीमार्गावरचे पुढचे पाऊल ठरेल.

सच्चिदानंद सद्गुरु श्री साईनाथ महाराज की जय!

★★★

# नववर्ष संदेश



श्री साई सच्चरितात मूलतः शिर्डीच्या श्री साईबाबांचा जीवनेतिहास, त्यांची वचने व त्यांच्या शिर्डीतील पाच दशकाहून जास्त अशा दीर्घ वास्तव्यकाळात त्यांनी ज्या तत्वज्ञानाचा पुरस्कार व प्रसार केला त्याचा समावेश आहे. या पुस्तकाचे लेखक श्री. गोविंद रघुनाथ उर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांनी त्याची रचना एकनाथी भागवताप्रमाणे 'ओवी' छंदात केली आहे. यात ५३ अध्याय असून एकंदर ९३०५ ओव्या आहेत.

पुस्तकात (पोथीत) उल्लेख केल्याप्रमाणे अण्णासाहेब दाभोळकर शिर्डीस सर्वप्रथम १९१० साली आले. १९११ मध्ये त्यांच्या मनात बाबांचे जीवन व उपदेश दर्शविणाऱ्या बाबांच्या लीला संग्रहित करण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्याबाबत श्री बाबांची परवानगी मागण्याकरता ते बाबांकडे गेले. त्यांना तशी संमतीही बाबांनी दिली. मात्र त्यानंतर १९१६ मध्ये नोकरीतून निवृत्त होईपर्यंत, पारिवारीक व नोकरीतील जबाबदाऱ्यांमुळे या संदर्भातले लेखन काही त्यांच्या हातून होऊ शकले नाही. १९१६ पासून ऑक्टोबर १९१८ मध्ये बाबांच्या महासमाधीपर्यंत या पोथीतील ५३ अध्यायांपैकी फक्त २ अध्यायच लिहून झाले होते. या २ अध्यायात बाबांच्या काही लीलांसोबत त्यांची दिनचर्या व आध्यात्मिक सद्‌गुरू म्हणून श्री बाबांचे महत्त्व विशद करण्यात आले होते.

पुस्तकाच्या प्रत्यक्ष लेखनास १९२२ सालच्या चैत्र महिन्यात (इंग्रजी 'एप्रिल' महिन्यात) सुरुवात झाली आणि १९२९ सालच्या ज्येष्ठ महिन्यात ('जुलै' महिन्यात) श्री साई चरित्राचे लिखाण पूर्ण झाले. परंतु ५२ व्या अध्यायात अवतरणिकेचा (अध्यायांमधील विषयांचे संक्षिप्त दर्शन घडवणारी अनुक्रमणिका) अंतर्भाव झालेला नव्हता. अवतरणिकेचा उल्लेख मात्र पुस्तकात आला होता. म्हणून मग जुलै १९२९ मध्ये अण्णासाहेबांचे निधन झाल्यानंतर श्री. बाळकृष्ण देव यांनी अवतरणिका लिहिली आणि ५३ वा अवतरणिकेचा अध्याय पोथीत समाविष्ट करण्यात आला.

बाबांचे एक निस्मीम भक्त श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांनी २६ नोव्हेंबर १९३० रोजी प्रथम श्री साईसच्चरित्र पुस्तकरुपाने प्रकाशित केले आणि त्याचे सर्व हक्क

'श्री साईबाबा संस्थान, शिर्डी' यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले होते. त्यानंतर गुजराती, तेलगू आणि कन्नड या भाषांमध्ये याचा अनुवाद अगदी ओळन्‌ओळ या स्वरूपात झाला. इंग्रजी, हिंदी, तेलगू, तामिळ, कन्नड, उर्दू, गुजराती, सिंधी, बंगाली, ओरिया, मराठी इ. विविध भाषांत याची विविध रूपांतरे उपलब्ध आहे. १९४४ मध्ये नागेश वासुदेव गुणाजी या बेळगावच्या विद्वानाने याचा इंग्रजी रूपांतरित अनुवाद केला, (Shri Sai Satchrita) आणि त्याचे सर्व उत्पन्न त्यांनी 'श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी' यांस दान दिले.

अण्णासाहेब दाभोळकर उर्फ हेमाडपंत प्रथम १९१० मध्ये शिर्डीला आले आणि त्यानंतर बाबांच्या महासमाधीपर्यंत ते वरचेवर शिर्डीस येत असत. असं दिसतं की, १९१० पूर्वी त्यांचा बाबांशी किंवा शिर्डीशी काहीच प्रत्यक्ष संबंध नव्हता. त्याआधी बाबांविषयी काही ऐकीव माहिती कदाचित त्यांना मिळाली असेल. संशोधन प्रक्रियेमध्ये सत्यता सिद्ध करण्यासाठी अशी ऐकीव माहिती प्रमुख आधार म्हणून गणली जाऊ शकत नाही. अण्णासाहेबांच्या शिर्डीतील थोड्या-थोड्या कालावधीच्या भेटीदरम्यान बाबांशी संवाद साधण्याचा व त्यांच्या क्रिया कलापांविषयी जाणून घेण्याचा मर्यादित अवसरच त्यांना मिळाला. त्यांच्या शिर्डी वास्तव्यादरम्यान त्यांचा बाबांशी जो प्रत्यक्ष संवाद झाला त्या संबंधीच्या अगदी थोड्या लीलांचे वर्णन श्री साईसच्चरित्रात आले आहे. सच्चरित्रात वर्णित इतर लीला या वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या भक्तां संबंधात घडलेल्या आहेत की ज्या त्या त्या भक्तांनी अण्णासाहेबांना नंतर सांगितल्या होत्या.

यातील काही लीला आपण सत्यसिद्धतेसाठी आधार म्हणून गृहीत धरल्या तरी इतर काही गोष्टी मात्र ऐकीव असण्याची शक्यता भासते. याचे कारण असे की, जरी १९११ सालीच पुस्तक लिहिण्यासंदर्भात लेखकाला बाबांकडून संमती मिळाली होती, तरी एकूण ५३ अध्यायांपैकी केवळ दोनच अध्याय १९१८ साल संपेपर्यंत लिहून झाले होते. बाबांची अनुमती मिळाल्यावर लेखकाने इतर भक्तांच्या अनुभवांच्या नोंदी व टाचणे करून ठेवण्यास सुरुवात केली आणि ते काम बाबांच्या महासमाधीनंतरही लेखकाच्या मृत्यूपर्यंत सुरुच होते. प्रायः हे पुस्तक साईबाबांशी प्रत्यक्ष संबंध आलेल्या इतर भक्तांच्या व स्वतः लेखकाच्या अनुभवाचे एक उत्तम संकलन आहे.

५३ अध्यायापैकी ५२ अध्याय लेखकाने मृत्यूपुर्वी लिहिले होते आणि शेवटचा अध्याय त्यांच्यानंतर बाळकृष्ण देवांनी लिहिला.

माझे असे अनुमान आहे, की श्री साई सच्चरिताव्यतिरिक्तही असे बरेच साहित्य आहे

की, ज्यात बाबांच्या लीला वर्णन केल्या आहेत व जे लोकांना उपलब्ध होऊ शकते. शोधक बुद्धीच्या भक्तांसाठी त्यापैकी काही संदर्भ खाली नमूद केले आहेत.

★ 'श्री साईनाथ प्रभा' - ''दक्षिणा भिक्षा संस्था' तर्फे १९१६ ते १९१९ या कालावधीत प्रकाशित करण्यात आलेले द्वैभाषिक मासिक.

★ दासगणूंनी मराठीत लिहिलेले भक्तलीलामृत आणि संतकथामृत.

★ सौ. सावित्रीबाई रघुनाथ तेंडुलकर यांनी लिहिलेली 'साईनाथ भजनमाला'.

★ श्री दादासाहेब खापर्डे यांनी लिहिलेली त्यांची रोजनिशी. यात बाबांच्या हयातीत आणि नंतरही झालेल्या त्यांच्या शिर्डी भेटींच्या वेळच्या आठवणी आहेत.

★ अमीदास भवानी मेहता यांनी लिहिलेले गुजराती पुस्तक.

★ १९१६ साली इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेले साईबाबांच्या भक्तांचे लेख/अनुभव.

★ एप्रिल १९२३ पासून आजतागायत श्री साईबाबा संस्थानामार्फत अधिकृतपणे प्रसिद्ध होत असलेले 'साईलीला' हे नियतकालिक.

★ बाबांविषयक प्रसिद्ध झालेली इतर अनेक छोटी-मोठी मराठीतील पुस्तके, पुस्तिका व नियतकालिके.

★ अलिकडे प्रकाशित झालेल्या काही पुस्तकांमध्ये नमूद करण्यात आलेल्या बाबांच्या लीला की, ज्यांचा उल्लेख साई सच्चरितात नाही. साईसच्चरिताहून अधिकची काही माहिती व लीलांचे वर्णन काही लेखकांनी यात केले आहे. त्यांचा स्रोत नक्कीच वेगळा असणार.

★ खूपशी माहिती आंतरजालावर (Internet) वेगवेगळ्या Websites वर उपलब्ध आहे.

श्री साईबाबांचे नाव आणि कीर्ती आता केवळ शिर्डी, महाराष्ट्र वा भारतापुरती मर्यादित राहिलेली नाही. ती वैश्विक झाली आहे. जगभरातील बाबांच्या भक्तगणांच्या आणि मंदिरांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर बाबांच्या तत्वज्ञानाचे, उपदेशाचे व लीलांचे जे पैलू आत्तापर्यंत अप्रकाशित राहिले आहेत त्यांना प्रकाशात आणण्यासाठी संशोधक वृत्तीच्या साईभक्तांनी योगदान देणे उचित ठरेल. या विषयासंबंधात संशोधन हाती घेण्यास बराच वाव आहे.

श्री बाबांची कृपा आपल्या सर्वांवर असो!

**- श्री. चंद्रभानु सतपथी**
नवी दिल्ली

# नानासाहेब चांदोरकरांस नैतिक धडे

बाबा नानासाहेबांजवळ प्रथम प्रथम स्पष्ट व मनमुराद बोलत असत. बाबांना प्रख्यातीत आणण्यास व त्यांची कीर्ती वाढविण्यास नानासाहेबच कारणीभूत आहेत, असे म्हणण्यात अतिशयोक्ती होणार नाही. बाबा मूळचेच अमोल रत्न; परंतु हे रत्न शिरडीसारख्या लहानग्या गावात पडले असल्यामुळे त्यांची किंमत कोण करणार? ''न रत्नमन्विष्यति मृग्यतेहि तत्''या प्रसिद्ध कालिदासोक्तिप्रमाणे आपल्या परीक्षकाचा शोध करण्याकरिता रत्न कधी त्याच्याकडे जात नाही. परीक्षकच त्याच्या शोधार्थ त्याजकडे जातो. त्याचप्रमाणे आपण कोण हे समजावून देण्याकरिता बाबांना दुसरीकडे जाण्याची काय गरज? ज्याला रत्नाची पारख व जरूर असेल तो येईल त्याच्याकडे. ही गोष्ट यद्यपि खरी असली, तरी बाबांचा व नानासाहेबांचा पूर्वजन्मीचाच काही एक निराळा संबंध होता व त्यामुळे 'बाबांनी तुला एक वेळ बोलविले आहे' असा निरोप नानासाहेबांस सांगण्यास बाबांनी शिरडीचे आप्पा कुळकर्णी यांस सांगितले होते.

बाबांचे दर्शन नानासाहेबांस झाल्यावर पुढे नानासाहेबांना काही अनुभवांनंतर बाबांचा इतका नाद लागला की, त्यांस बाबांवाचून चैन पडत नसे. जिथे तिथे त्यांस बाबाच दिसत. ज्याला त्याला ते बाबांच्याच कथा सांगत. भक्तशिरोमणी काकासाहेब दीक्षित, त्याचप्रमाणे शारदाभूषण नानासाहेब वैद्य आदिकरून बडीबडी मंडळी नानासाहेबांमुळेच शिरडीस बाबांच्याकडे येऊ लागली. त्यानंतर इतरही पुष्कळ ठिकाणचे विद्वान् पंडित, पदवीधर येऊ लागले व त्यामुळे बाबांची उज्ज्वल कीर्ती जिकडे तिकडे पसरली. त्यानंतर कविरत्न दासगणु महाराज यांनीही बाबांची कीर्ती देशोदेशी पसरविण्यात पुष्कळ भर घातली. नानासाहेबांनी बाबांच्याकरिता पुष्कळ पैसे खर्च केले असो.

नानासाहेब म्हणाले, ''बाबा आपल्याला परमार्थाचे धडे देत असत. बाबांची धडे देण्याची व ते पाठ झाले आहेत किंवा नाही हे पाहण्याची शैली काही अप्रतिम असे.'' बाबा एकदा म्हणाले, ''नाना, सर्व षड् विकारात जिंकण्यास अतिशय सोपा असा विकार कोणता रे?'' नानासाहेब म्हणाले, ''मला माहीत नाही.'' त्यावर बाबा म्हणाले, ''अरे, मत्सर हा विकार जिंकण्यास फार सोपा. या विकारात आपले नफा-नुकसान काहीच नाही. मत्सर म्हणजे दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणे. नाना, दुसऱ्यास

ऐश्वर्य प्राप्त झाले म्हणजे आपल्याला सहन होत नाही. आपण त्याची निंदा करतो. त्याचे नुकसान होण्यात आपल्याला आनंद वाटतो; पण हे का बरे? असा त्याचा उत्कर्ष झाल्यास आपले नुकसान काय होते? पण मनुष्य याचा कधीच विचार करीत नाही. त्याला ऐश्वर्य प्राप्त झाले, तर आपण आनंद मानावा व आपणही तसे ऐश्वर्य प्राप्त करून घेऊ अगर प्राप्त करून घेण्याची खटपट करू अशी इच्छा बाळगावी व हिंमत धरावी. त्याने आपले काय घेतले आहे? काही नाही. त्यात त्याच्या कर्मानुसार ऐश्वर्य प्राप्त झाले, म्हणून आपणास वाईट कशास वाटावयास पाहिजे? म्हणून प्रथम मत्सर जिंकावा.'' नानासाहेबांनी बाबांचे चरणयुगल वंदन केले व म्हणाले की, ''बाबा, आजपासून मी मत्सर जिंकण्याचा प्रयत्न करीन.''

काही महिने लोटल्यावर नानासाहेब असेच एक वेळा बाबांच्या जवळ बसले असता बाबा म्हणाले, ''नाना, आज तुला मी एक दुसरा धडा देणार आहे.'' नानासाहेब म्हणाले, ''फार उत्तम.'' बाबा म्हणाले, ''नाना, जर आपल्याजवळ कोणी काही मागू लागला व त्याचे मागणे आपल्या आहारात (आवाक्यात, ऐपतीत) असले किंवा हस्ते परहस्ते त्याच्या मागण्याची पूर्तता आपल्यास करू देता येण्यासारखी असल्यास त्यास कधीही नाही म्हणू नये. आपल्या जवळ जर काही नसेल, तर त्यास गोड शब्दात नाही म्हणून सांगावे. त्याची थट्टा अगर उपहास करू नये व त्यावर रागवू नये. कदाचित आपल्या जवळ असून आपली त्यास देण्याची इच्छा नसल्यास मजजवळ काही नाही असे खोटे बोलू नये. मजजवळ आहे, पण देण्याची सवड नाही किंवा माझी इच्छा नाही असे त्यास सौम्य शब्दात सांगावे.'' याप्रमाणे बोलून बाबा म्हणाले, ''नाना, हा धडा ध्यानात राहील का विसरशील?'' नानासाहेब म्हणाले, ''यात काय आहे? मी हा ध्यानात ठेवीन.'' बाबा म्हणाले, ''नाना, धडा जितका सोपा दिसतो तितका सोपा नाही. दिसण्यात सोपा दिसला, तरी त्याप्रमाणे वर्तन करण्यास फार कठीण आहे.'' नानासाहेब म्हणाले, ''बाबा, धडा कठीण असला तरी मी तो मनापासून लक्षात ठेवीन.'' बाबा म्हणाले, ''बरे आहे.''

या पूर्वीच मजा काय झाली होती की, कोपरगावी शिरडीच्या रस्त्याच्या सडकेस लागूनच श्रीगोदातटी एक लहानसे दत्त मंदिर आहे. तेथे एक बोवा राहत असत. ते बोवा आचरणाने चांगले असत. नानासाहेब शिरडीस जाऊ लागले म्हणजे दत्तदर्शन घेण्याकरिता जात असत. इतकेच नव्हे, तर ते त्या मंदिरातील दत्तदर्शन केव्हाही टाळीत नसत. दत्तदर्शनामुळे तेथील बोवांचा व त्यांचा बराच परिचय झाला होता. बोवांनी एक

दिवस नानासाहेबांजवळ हळूच गोष्ट काढली की- ''माझ्या मनात देवळासमोर श्री गोदावरीस घाट बांधावा, म्हणजे मंदिरास शोभा येऊन घाटावर सायंकाळचे वेळी मोकळ्या हवेत लोकांना बसण्यासही मजा वाटेल; कपडे वगैरे धुण्याची व पर्जन्यकाळी प्रातःस्नानाची चांगली सोय होईल. तेव्हा एवढे कार्य करण्याचे आपण श्रेय घ्यावे.'' नानासाहेब म्हणाले, ''बोवा, हे काम फार खर्चाचे आहे. घाट बांधण्याचे काम थोडक्यात केव्हाच होणार नाही.'' बोवास माहीत होते की, नानासाहेब भाविक व श्रीमंत आहेत, कलेक्टर साहेबांचे चिटणीस आहेत व त्यांना पगारही पुष्कळ मिळतो. तेव्हा त्यांनी ते मनात आणिल्यास स्वतः किंवा इतरांची मदत घेऊन करू शकतील. म्हणून त्यांनी नानासाहेबांजवळ हळूहळू व युक्तीप्रयुक्तीने गोष्ट काढली; परंतु नानासाहेबांनी ती कबूल केली नाही. नानासाहेब दर्शनास गेले की बोवा त्यांचेजवळ प्रत्येक वेळी ही गोष्ट काढीत. पुष्कळ वेळ तीच तीच गोष्ट मनुष्य सांगू लागला म्हणजे ऐकणारा, प्रस्तर अंतःकरणाचा जरी असला, तरी त्याच्या मनावर त्याच्या सांगण्याचा काहीना काही तरी परिणाम हा होतोच. तशात नानासाहेब तर भाविक व श्रद्धाळू. शिवाय हे मंदिर बाबांच्या शिरडीच्या वाटेवर गोदातटी. आहाराच्या (आवाक्याच्या/ ऐपतीच्या) बाहेर काम, तरी त्यांना मी हे करीतच नाही असे एकाएकी बोवांना निक्षून सांगण्याचे जीवावर आले आणि ते बोवांना म्हणाले की, ''बोवा, तुम्ही म्हणता तशा तऱ्हेचा घाट बांधण्यास हजारो रुपये खर्च लागेल व तशी तजवीज मजकडून होणे शक्य नाही; परंतु तुम्ही म्हणताच तर मंदिरापुरते दहा-बारा पायऱ्यांचा मंदिराइतक्याच रुंदीचा घाट बांधण्यास माझ्या अजमासाप्रमाणे तीनेकशे रुपये खर्च येईल व तितके काम फार तर मी करू शकेन.'' 'कोल्हा काकडीस राजी'. बोवा म्हणाले, ''आपण तूर्त तितके केले तरी पुष्कळ होईल.'' नानासाहेब म्हणाले, ''बरे तर, तुमची तशीच इच्छा असल्यास मी तितक्या पैशांची तजवीज करीन.'' याप्रमाणे उभयतांचे बोलणे होऊन नानासाहेब परत नगरास गेले.

नंतर काही दिवसांनी नानासाहेबांस बाबांचे दर्शन घेण्याची इच्छा झाली. याप्रमाणे त्यांनी एक दिवस नक्की करून आपल्या एका स्नेह्यासबरोबर घेऊन ते शिरडीस जाण्याकरिता रात्रीच्या गाडीने निघाले व कोपरगावास जरा थोडीशी रात्र असतानाच आले. कोपरगावी येताच त्यांच्या मनात आले की, आता आपण जर दत्तदर्शनाकरिता दत्तमंदिरात शिरलो तर बोवा आपल्याजवळ तीनशे रुपये मागेल आणि त्याने त्या रकमेची मागणी केली म्हणजे आपल्यास नाही म्हणता येणार नाही. आपण इतके पैसे

बरोबरही आणले नाहीत व इतक्या रकमेची आजपर्यंत सोयही केली नाही, तरी कसे करावे? इतक्यात त्यांना एक युक्ती सुचली की, या खेपेस मंदिरावरून न जाता दुसऱ्या मार्गानेच परभारे शिरडीस जावे. त्यांनी ही सर्व गोष्ट आपल्या स्नेह्यास सांगितली व त्यांचाही सल्ला विचारला. त्यांनाही नानासाहेबांचे म्हणणे पटले. त्यांनीही नानासाहेबांस त्यांना सुचलेल्या युक्तीप्रमाणेच करण्याचा सल्ला दिला. नानासाहेबांस बाबांनी काय धडा दिला होता, हे नानासाहेबांच्या स्नेह्यास काय माहीत? नानासाहेबांनाही बाबांनी दिलेल्या धड्याची त्यावेळी विस्मृती झाली. म्हणून त्यांनी नेहमीच्या रिवाजास फाटा देऊन, दत्तदर्शन टाळून, परभारे जाण्याचा विचार केला. कोपरगावास जावे तिकडे बाभळी व निवडुंग. नानासाहेब व त्यांचे स्नेही प्रथम शौचास निघाले. तेव्हा जरा अंधारच होता व रस्ताही नेहमीचा नसल्यामुळे त्यांची व त्यांच्या स्नेह्यांची फारच तारांबळ उडाली आणि त्यांच्या पायात व शरीराच्या इतर भागांतही बाभळीचे व निवडुंगाचे काटे बोचले. ते कसेबसे आडमार्गातून नेहमीच्या सडकेस येऊन मिळाले. एकंदरीत त्यांचे आडमार्गावलंबनामुळे पुष्कळसे हाल झाले, पण करणार काय? जाणूनबुजूनच तो मार्ग पत्करला! त्यांचे स्नेही शौचास बसतात तोच त्यांच्या गुह्यस्थानी एका बाभळीच्या झाडाची खुंटी शिरली. त्यामुळे ते फारच विव्हळ झाले. असो, पुढे चांगले फटफटीत झाले. दोघांनीही आपल्या शरीरातील व पायातील काटे हळूहळू काढून ते राजरस्त्याने चालू लागले व शिरडीस पोहोचले.

नानासाहेबांस बाबांच्या दर्शनाची अत्युत्कंठा. ते लागलेच मशिदीत गेले व बाबांच्या चरणांना वंदन करून बाबांच्या जवळ बसले. बाबा नानासाहेबांशी काहीच बोलले नाहीत. सद्‌गुरु वचनामृताची नानासाहेब नेहमीप्रमाणे वाट पाहू लागले. नेहमीची पद्धत अशी असे की, नानासाहेब आले की, बाबा त्यांना- ‘‘नाना, केव्हा आलास? कसे काय?’’ वगैरे कुशल प्रश्न विचारावयाचे. या खेपेस नानासाहेब बराच वेळ बसले, तरी बाबा एक शब्दही त्यांच्याशी बोलले नाहीत. आपली चूक कोठे झाली किंवा आपण बाबांचा धडा लक्षात ठेवण्यास विसरलो हे नानासाहेबांच्या ध्यानात आले नाही. बाबांचे मन दुसरीकडे कोठे तरी गेले असेल व त्यामुळे ते आपल्याशी नेहमीप्रमाणे बोलले नसतील; आता बोलले नाही तर मग बोलतील, असे नानासाहेबांस वाटले. थोडा वेळ वाट पाहून ते वाड्यात निघून गेले. बाबा का बोलले नाहीत याबद्दल त्यांनीही बाबांना विचारले नाही. नानासाहेब वाड्यात गेले खरे, पण बाबा आपणाजवळ बिलकूल बोलले नाहीत याबद्दल हुरहुर लागली. त्यांचे चित्त व्यग्र झाले.

त्यांस काही सुचेना. त्यांस खिन्न वाटू लागले. शिरडीस येऊन गुरुमाय बोलत नाही, मग शिरडीस यावयाचे तरी कशाला? असेही त्यांस वाटू लागले. पुन्हा ते मशिदीत गेले. पुन्हा बाबांचे चरणवंदन केले. आता तरी बाबा दोन शब्द बोलतील अशा अपेक्षेने पुन्हा त्यांच्या जवळ बसले. बाबा काहीच बोलले नाहीत. मग मात्र नानासाहेबांची निराशा होऊन बाबांस त्यांच्याशी न बोलण्याचे कारण विचारले. बाबा म्हणाले, ''नाना, जो आपला धडा पाठ करीन म्हणतो व करीत नाही, त्याच्या जवळ आपण कशाला बोलावे!'' नानासाहेब म्हणाले, ''आपण दिलेले धडे तर मी बरोबर ध्यानात ठेवितो.'' बाबा म्हणाले, ''अरे गृहस्था, बोवा तीनशे रुपये मागेल म्हणून सरकारचे दर्शन टाळावयाचे व आडमार्गाने जावयाचे, ही धडा पाठ करण्याची कोठली पद्धत! अरे, तू पैसे आणले नव्हतेस किंवा पैशाची सोय तुजकडून झाली नव्हती तर बोवा तुला काय खाता? त्यास सांगावयाचे की पैशाची अद्याप सोय झालेली नाही; परंतु बोवा पैसे मागेल म्हणून सरकार-दर्शन टाकून मुद्दाम आडमार्गाने जावयाचे ही कोठची युक्ती? बरे तर मग, पायात व अंगात काटे शिरले की नाही? आणि तुझ्या बरोबर आलेले ते शहाणे त्यांच्या... खुंटी शिरली की नाही? मग अशा मनुष्याशी आपण कशाला बोलावे?''

यांप्रमाणे बाबांचे बोल ऐकल्याबरोबर बाबांच्या सर्वसाक्षित्वाबद्दल नानासाहेबांस अत्यंत कौतुक वाटून, त्यांना त्यांची चूकही कळून आली. आता मी पुन्हा अशी चूक करणार नाही, असे बोलून नानासाहेबांनी पुन्हा त्या जगज्जनकाचे चरणवंदन केले व गुरुमाऊलीच्या भक्तवत्सतेबद्दल व पारमार्थिक धडे देऊन त्यांची परीक्षा पाहण्याच्या अद्वितीय कुशलतेबद्दल धन्यता मानिली.

नंतर बरेच दिवस लोटल्यावर एके दिवशी नानासाहेब बाबांच्या दर्शनास गेले असतात बाबा म्हणाले, ''नाना, तुला आज एक दुसरा धडा देतो.'' नानासाहेब म्हणाले, ''फार उत्तम.'' त्यावर बाबा म्हणाले, ''नाना, आपल्याकडे कोणी काही मागावयास आला तर आपल्या शक्तीप्रमाणे व इच्छेप्रमाणे त्यास द्यावे व तो तेवढ्याने तृप्त होत नसेल व जास्त मागत असेल तर त्याला गोड शब्दांनी नाही म्हणून सांगावे. त्याच्यावर रागाऊ नये अथवा त्यास आपल्या संपत्तीचा अथवा अधिकाराचा जोर दाखवू नये.'' नानासाहेब म्हणाले, ''बरे. मी आपण सांगितल्याप्रमाणे वागेन.'' याप्रमाणे बोलून बाबांस वंदन करून नानासाहेब परत गेले. धडा दिला की त्याप्रमाणे वर्तन होते का होत नाही, याची परीक्षा पाहण्याची बाबांची पद्धत असे, म्हणून वर सांगितले आहे याचा अनुभव खुद्द मलाही आहे.

वरील धड्यास बरेच महिने जाऊ दिले व एके दिवशी चमत्कार केला की, त्या वेळी नानासाहेब कल्याणला होते व घरात आईसाहेबांनी (नानासाहेबांच्या कुटुंबाने म्हणजे पत्नीने) एक डेराभर भाजणी नुकतीच तयार करून ठेवली होती. एक भिकारीण भीक मागण्याकरिता नानासाहेबांच्या वाड्यात आली व भीक मागू लागली. घरातील मंडळी नेहमीप्रमाणे नेहमीची भिक्षा घालू लागली. भिक्षेकरीण म्हणे, ''मला ती भिक्षा नको. मला भाजणी पाहिजे.'' आईसाहेब म्हणाल्या, ''तिला भाजणी पाहिजे असेल तर घाल थोडीशी.'' त्यांचे आज्ञेप्रमाणे मंडळी भाजणी घेऊन गेली व घालू लागली. ती म्हणे, ''मला पुष्कळ भाजणी पाहिजे.'' आईसाहेबांनी आणखी थोडीशी जास्त भाजणी आणली, तरी ती म्हणे, ''छे, मला पुष्कळ भाजणी पाहिजे.'' आईसाहेब म्हणाल्या, ''अगं, पुष्कळ म्हणजे किती? माझ्या घरात मुलेबाळे आहेत. भाजणी त्यांना लागते. ती अगदी संपली होती, म्हणून परवाच मी नवी केली. मी तुला पुष्कळ ती किती घालू?'' ती म्हणे, ''पुष्कळ घाला.'' ''बरे, फारच कटकट करतेस म्हणून अर्धी घालते'', असे सरतेशेवटी कंटाळून आईसाहेब म्हणाल्या. ती म्हणली, ''सगळीच घाला.'' आईसाहेब म्हणाल्या, ''मग तर तू फार शहाणी! वाटले तर अर्धी देते नाही तर जा.'' ती आपला पहिलाच हट्ट धरून बसली व घराबाहेर जाईना. आईसाहेबांनी पराकाष्ठा करून पाहिली, परंतु ही भिकारीण आपला हेतु (हेका) काही सोडत नाही व घराबाहेरही जात नाही, असे पाहून त्यांनी ती गोष्ट दिवाणखान्यात नानासाहेब बसले होते, त्यांना जाऊन सांगितली. आपण अर्धी भाजणी देण्यास कबूल झाले असताना सुद्धा ती भिकारीण सर्वच भाजणी मागते व दिली नाही तर घरातून हलतही नाही, तरी आपण जरा खाली यावे, अशी त्यांना विनंती केली. हे ऐकताच नानासाहेबांस राग तर आलाच. ते खाली आले व ''कोण आहे रे शिपाई तेथे, या भिकारणीला हाकलून लावा'' असे रागाने म्हणाले. भिकारीण आणि म्हणे सगळी भाजणी द्या. सगळी भाजणी मागावयाला लाज तरी वाटते का? घ्यायची असेल तर देतात तितकी घे, नाही तर शिपायाकडून हाकून देतो तुला.'' भिकारीण म्हणाली, ''महाराज, नसेल द्यावयाची तर नका देऊ सगळी, पण शिपायाकडून गचांडी देऊन कशाला घालविता? मी आपली जाते.'' असे म्हणून ती भिकारीण निघून गेली.

पुढे काही दिवसांनी नानासाहेब बाबांच्या दर्शनाकरिता शिरडीस गेले. मशिदीत जाऊन बाबांचे चरणवंदन केले व नेहमीप्रमाणे बाबांच्या जवळ बसले. केव्हा आलास, कोण कोण मंडळी बरोबर आली आहेत वगैरे कुशल प्रश्न नेहमीप्रमाणे बाबांनी

नानासाहेबांना विचारले नाहीत. बाबा आता बोलतील, मग बोलतील अशी वाट पाहत नानासाहेब बराच वेळ बसले, परंतु बाबा त्यांच्याशी मुळीच काही बोलेनात. बाबांचे मौन नानासाहेबांस असह्य होऊ लागले. ते मनात विचार करू लागले की, बाबा आज नेहमीप्रमाणे आपल्याशी का बोलत नाहीत? काय बरे झाले? काय चुकले? का बाबांनाच आज बरे नाही? याप्रमाणे हजारो तरंग त्यांच्या मनात घोळू लागले; परंतु बाबांच्या मौनाचा त्यांना उमज पडेना व तशा त्या मुग्ध स्थितीत आणखी अधिक वेळ राहवेना. शेवटी नानासाहेब म्हणाले, ''बाबा, आज आपण मी येथे आल्यापासून एक शब्दही बोलत नाही हे काय?'' बाबा म्हणाले, ''जो आपला धडा गिरवत नाही त्याच्याशी काय बोलावयाचे? नानासाहेब म्हणाले, ''कोणता धडा मी गिरविला नाही? आपण सांगता ते धडे मी बरोबर गिरवितो. मला तर काही आठवत नाही की, आपण सांगितलेला धडा गिरविण्यास मी विसरलो.'' बाबा म्हणाले, ''मग त्या दिवशी ती भिकारीण भाजणी मागण्याकरिता आली होती व ती हट्ट धरून बसली होती व जात नव्हती तर अधिकाराच्या घमेंडीत तिला शिपायाकडून हाकून कशाला लावीत होतास? ती कितीएक वेळ तुझ्या दारात बसली असती व तिच्या मागणीप्रमाणे तिला भाजणी दिली नसतीस तर ती काय करती? काही वेळ वाट पाहून निघून जाती. मग गोड शब्दांनी सांगण्याऐवजी तिच्यावर रागावून तिला शिपायाकडून घालवून देण्यापर्यंत का मजल आली?''

बाबा काय म्हणतात व हे केव्हा झाले याची प्रथम नानासाहेबांस स्मृतीच होईना. कारण या गोष्टीस जवळ जवळ पाच-सहा महिने तरी झाले होते आणि बाबा अशा प्रकारच्या भिकारणीचे सोंग घेऊन आपली परीक्षा घेतील ही कल्पनाही त्यांच्या मनात नव्हती. पुढे काही वेळाने त्यांना या गोष्टीचे चांगले स्मरण झाले व आपल्या हातून ही चूक झाली खरी असे त्यांच्या लक्षात आले. तेव्हा ब्रह्मांड रंगभूमीवर पडद्याआड बसून मानव बुद्धिमत्तेपलीकडील अत्यंत लीलारूपी निरनिराळे देखावे दाखविण्यास कुशल अशा नाट्याचार्य बाबांच्या पारमार्थिक धड्यांचे व धड्यांची परीक्षा पाहण्याचे त्यांना अत्यंत सानंदाश्चर्य वाटले!

(ले कै. बाळकृष्ण विश्वनाथ देव -
'श्री साईवचनामृत' मधून)

# साईबाबांचे हेमाडपंत

साईबाबांच्या जीवनाविषयी एकमेव आधारभूत आणि साईभक्तांचा प्रिय ग्रंथ 'साईसच्चरीत', 'हेमाडपंतानी' १९२९ साली लिहिला. हे हेमाडपंत म्हणजे कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर.

श्री गोविंदरावांचा जन्म सन १८५६ साली ठाणे जिल्ह्यात कुडाळ देशस्थ गौड ब्राह्मण जातीत झाला. त्यांचे वडील देवभक्त होते. त्यांचे वडील त्यांच्या बालपणीच वारले, घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. इंग्रजी पाचवी इयत्ता पास झाल्यावर त्यांना पुढील शिक्षण सोडावे लागले. उदरनिर्वाहाचे काही साधन नसल्यामुळे त्यांना सुरुवातीस आठ रुपयांची शाळामास्तरची नोकरी करावी लागली. पुढे त्यांनी स्वतःच्या हुशारीने आणि प्रेमळ स्वभावामुळे तलाठी, अव्वल कारकून, नंतर मामलेदार आणि बांद्रा येथे रेसिडेंट मॅजिस्ट्रेट म्हणून काम केले. ते १९१६ साली या पदावरून सेवानिवृत झाले. त्यांना यथायोग्य पेंशन बसली.

श्री. दाभोळकरांचा विशेष स्नेह बांदऱ्यात रेसिडेंट मजिस्ट्रेट असताना श्री. काकासाहेब दीक्षितांशी जमला. ते दोघेही भगवद्गीता वाचत असत. दोघांपैकी कोणासही जर महात्मा पुरुष भेटला तर ते एकमेकांस त्याची बातमी देत. श्री. काकासाहेब दीक्षितांना १९०९ साली सद्गुरु साईबाबांचे पहिले दर्शन झाले. अशा अलौकिक महात्म्याचे दर्शन श्री. दाभोळकरांना सुद्धा व्हावे म्हणून काकासाहेब दीक्षित त्यांना घेऊन शिरडीला आले.

तो गुरुपौर्णिमेचा दिवस होता. भक्त मंडळी गुरुपूजेसाठी जमली होती. त्यावेळी अण्णा चिंचणीकरांनी दाभोळकरांसाठी बाबांकडे शिफारस केली. "बाबा यांच्या वाढत्या संसारासाठी यांच्यावर कृपा करा, दुसरी नोकरी लावा. पेंशन त्यांना कशी पुरी पडेल." त्यावर बाबा म्हणाले -

**"मिळेल मेली तयासी नोकरी। करावी आता माझी चाकरी। सुख संसारी लाधेल।**
**ताटे यांची भरली सदा । यावज्जीव न रिती कदा ।**
**भावे मत्पर होता सर्वदा । हरतील आपदा तयाच्या ॥"**

आणि, खरोखर साईबाबांनी श्री गोविंद रघुनाथ दाभोळकरांना स्वतःची चाकरी करायला लावली. आपण श्री साईसच्चरित्र लिहावे असे त्यांना वाटू लागले.

आपण श्री साईसच्चरित लिहावे असे त्यांना का वाटू लागले, तर ते सांगतात- एके दिवशी सकाळी साईबाबांनी हातात सूप घेतले, गव्हाच्या पोत्याजवळ गेले आणि मापावर माप भरून सुपात गहू काढले, नंतर दुसरे रिकामे पोते पसरले, वर जाते ठेवले आणि दळताना ढिला होऊ नये म्हणून जात्याचा खुंटा ठोकून घट्ट केला. मग बाह्या वर सारून, कफनीचा घोळ आवरून, पाय पसरून आणि बैठक मारून बाबा ते गहू दळायला जात्याच्या शेजारी बसले. दाभोळकर मनात म्हणाले, अनेक संत पाहिले. पण दळणारा हा एकच.

आपले सारे आयुष्य ज्यांनी भिक्षा मागून आणि ठिगळे लावलेली फाटकी कफनी घालून घालविले त्यांचे चरित्र लिहावे असे दाभोळकरांना वाटू लागले. त्यांना वाटले, मी स्वतः जरी जडबुद्धीचा असलो तरी त्याच भगवंताने माझ्या मनात ही स्फूर्ती जागृत केली आहे. तेव्हा माझे कार्य सिद्धीस नेण्यास तोच समर्थ आहे. भक्त जी सेवा करण्याचे ठरवितात ती ती सेवा संत स्वतःच करवून घेतात.

साईबाबांच्या कथा अपार व अपूर्व आहेत. संपूर्ण कथा जरी आदरपूर्वक ऐकल्या तरी साधा भोळा भक्तही भवसागर पार करून जाईल. त्यासाठी साईबाबांची कृपादृष्टी आवश्यक होती. पण बाबांना विचारण्याचा धीर दाभोळकरांना होत नव्हता. त्यांनी ही गोष्ट माधवरावांच्या कानावर घातली. माधवराव बाबांना म्हणाले, ''आपली परवानगी असेल तर दाभोळकर आपले चरित्र लिहावयाचे म्हणतात.'' बाबा म्हणाले ''तुझे मनोरथ पूर्ण होईल.'' दाभोळकरांनी बाबांच्या पायावर मस्तक ठेवले. बाबांनी दाभोळकरांना उदीचा प्रसाद दिला आणि मस्तकावर आशीर्वादपूर्वक हात ठेवला. बाबांनी जणू काय श्री गोविंद रघुनाथ दाभोळकरांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेऊन त्यांना स्वचरित्र लिहावयाचा आदेश दिला.

संत चरित्र लिहिणे सर्वात कठीण. संत चरित्र लिहावयाचे म्हणजे दिव्य चक्षू हवेत, दिव्य मन हवे. संतांच्या विविध कृती, त्यांची विचारसरणी समजण्यासाठी लागणारी निपुणता अंगी हवी. ग्रंथ रचनेचे सूक्ष्म ज्ञान हवे. भगवंताची कृपा आणि सद्‌गुरुची कृपा असल्याशिवाय हे शक्य होत नाही. ''जे जे संतचरित्रे लिहितात त्यांच्यावर भगवंताची कृपा असते,'' असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

भगवंत आपल्या लाडक्या भक्ताला हाताशी धरून त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवून कोणाला मठ तर कोणाला देऊळ, कोणाला घाट, तर कोणाला स्वचरित्राचा पाठ करवतो. कोणाला कीर्तन करण्यास लावतो तर कोणास तीर्थ यात्रेला

धाडतो. कोणाला करूणासागर आणि दयाळू सद्गुरूकडे पाठवतो. कोणाला स्वचरित्र लिहिण्याची बुद्धी देतो तर कोणाला ग्रंथ लिहिण्यास बसवतो. त्याप्रमाणे बाबांनी श्री गोविंद रघुनाथ दाभोळकरांच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेऊन त्याना स्वचरित्र लिहावयाला बसवले. त्यांनी १९१६ साली वयाच्या साठाव्या वर्षी सेवानिवृत्ती नंतर ते लिहिले.

भगवंताने वाल्मींकीकडून रामायण तर, व्यासांकडून महाभारत लिहून घेतले. सन १७७८ साली महिपतींच्या करवी साधुसंतांची चरित्रे लिहवून घेतली. त्यांनी भक्तविजय, संतविजय, भक्तलीलामृत, संतलीलामृत हे ग्रंथ लिहिले. तसेच शके १८७८ साली दासगणूंच्या हातून भक्तलीलामृत, संतकथामृत लिहवून घेतले.

ग्रंथकाराला सुद्धा कठीण परीक्षेत पास व्हावे लागते. पहिली परीक्षा पांडित्याचा अभिमान सोडणे आणि दुसरी परीक्षा आपण कोणीतरी मोठे आहोत याचा अहंकार सोडणे. साईबाबांनी सुद्धा दाभोळकरांची परीक्षा घेतली. दीक्षितवाड्यात ''गुरू कशाला हवा'' आणि ''दैव थोर की कर्तृत्व थोर''या विषयावर श्री. दाभोळकर आणि त्यांचे मित्र श्री. बाळासाहेब भाटे यांच्याशी वादविवाद झाला.

दाभोळकर म्हणाले : आपली स्वतंत्रता बुडवून परतंत्रता कशाला ओढवून घ्यावी! जेथे आपले कर्तव्य पार पाडण्याची हुशारी असते तेथे गुरुची काय आवश्यकता! ज्याचे त्यानेच केले पाहिजे. जो करीत नाही त्याला गुरुने काय करावे!

बाळासाहेब भाटे म्हणाले : वेदपारंगत पंडित असला परंतु त्याच्यावर गुरुची कृपा नसली तर ते निव्वळ पुस्तकी ज्ञान होय.

यावर दाभोळकर म्हणाले : केवळ दैवावर भार टाकून काय होणार!

बाळासाहेब भाटे म्हणाले : होणाऱ्या गोष्टीचा प्रतिकार करता येत नाही, भविष्य टाळता येत नाही. मी मी म्हणणारे थकले. नशिबापुढे कोणी जावे! एक करता दुसरेच उद्भवते.

दाभोळकर म्हणाले : असे कसे म्हणता! करील त्याचेच सर्व आहे. आळशासारखा बसून राहणाऱ्याला दैव कसे साहाय्य करील. आपण आपला उद्धार करावा असे स्मृती ओरडून सांगते. (गीता-अ.६ श्लोक) तिचा अनादर करून संसारसागर तरुन जाणे अशक्य. हे ज्याचे त्यालाच करावे लागते. मग गुरुच्या मागे कशाला लागा. आपले खरे व खोटे किंवा चांगले व वाईट कोणते याचा विचार करण्याची बुद्धी, आपले साधन, आपली चित्तशुद्धी हे सर्व झुगारुन देणाऱ्या मुर्खाला गुरू सिद्धि कशी देईल! शेवटी वाद

संपला नाही आणि त्यातून काही निष्पन्नही झाले नाही. दाभोळकर मनाचे स्वास्थ्य मात्र गमावून बसले.

साईबाबांना दाभोळकरांचा अभिमान आणि अहंकार अंतर्ज्ञानाने कळला. बाबांच सर्व घटना घडवून आणीत असत आणि त्या अनुसार भक्तांना उपेदश सुद्धा करीत असत. बाबांनी या घटनेतून सर्व भक्तांना समजावले ''ज्याची वादावादी करण्याकडे प्रवृत्ती असते त्याच्या ठिकाणी अविद्या व माया समृद्धपणे असते. त्याला स्वहिताची शुद्धी नसते. त्याला अज्ञानाने वेढलेले असते आणि तो आत्मज्ञानाला पात्र नसतो. त्याला या पृथ्वीवरचे किंवा स्वर्गातले सुख नसते. सदा सर्व ठिकाणी दुःख असते. म्हणून आपला मुद्दा सिद्ध करणे नको किंवा दुसऱ्याचा मुद्दा खोडून काढणे नको.'' (ओ. ८७-८९).

मशिदीत आल्यावर साईबाबांनी दाभोळकरांकडे बोट दाखवून काकासाहेब दीक्षितांना विचारले. ''वाड्यात काय चालले होते? कशाचा वाद होता आणि भांडत का होता?'' हे हेमाडपंत काय म्हणत होते? आपण काही तरी चूक केली आहे हे दाभोळकरांच्या तत्काळ लक्षात आले. साईबाबांच्या मुखातून निघालेल्या विलक्षण, पण सूचक, अर्थपूर्ण नामकरणाला भूषण मानून श्री. गोविंदराव दाभोळकरानी त्याचा स्वीकार केला. संस्कृत भाषेत हेमाद्रीपंत तेच मराठी भाषेत हेमाडपंत. हेमाद्रिपंतांचे सर्व गुण त्यांनी आत्मसात करावे आणि वाद करण्याचा ताठा गळून जावा आणि मरेपर्यंत सदा नम्र राहण्याचे भान राहावे म्हणून साईबाबांनी ही पदवी दिली असावी.

मूळचे हे हेमाद्रिपंत कोण होते? तेराव्या शतकात देवगिरी दौलताबादला यादव नावाचे राजे होते. त्यांनी महाराष्ट्राचा गौरव वाढवला. याच घराण्यात त्याचा प्रौढप्रताप, पुण्यकीर्ती पुतण्याही आपल्या पराक्रमाने प्रख्यात झाला होता. या दोघांचे बहुगुणी व सर्वलक्षणी ''हेमाद्री'' नावाचे एक मंत्री होते. ते वत्स गोत्राचे आणि यजुर्वेदी होते. ते धर्मशास्त्रावर ग्रंथ रचना करणाऱ्या ब्राह्मणाच्या बाबतीत अत्यंत दानशील होते. हेमाद्रिपंतानी श्रुति-स्मृतिंना अनुसरून वागण्याची आचारव्यवस्था व्यवस्थित रूपात प्रथम मांडली. ''चतुर्वर्गचिंतामणि'' नावाचा व्रत, दान, तीर्थ व मोक्ष या चार प्रकरणांचे सविस्तर विवेचन असलेला ग्रंथही या हेमाद्रिपंतानी लिहिला. ते धर्मशास्त्र विधिनियमांचे सूक्ष्म ज्ञान असलेले निपुण विद्वान होते. ते राजकारणप्रवीण मुसद्धी आणि त्या काळी धूर्त राजकारणपटू म्हणून प्रसिद्ध होते. हेमाडपंती स्थापत्य कलेचा व मोडी लिपीचा उद्गाता किंवा संस्थापक म्हणून हेमाद्रिपंत प्रसिद्ध आहेत. त्यांचे राजकारणप्रशस्ती नावाचे संस्कृत काव्य प्रसिद्ध आहे. ते ग्रंथलेखनाच्या कलेत निष्णात होते. त्यांनी

''लेखनकल्पतरू'' नावाचा काव्यसंग्रह लिहिला.

बाबा म्हणाले, ''माझ्या कथा, वार्ता व अनुभवांचा खराखुरा संग्रह करावा. त्याची नोंद करून दफ्तर ठेवणे चांगले. त्याला माझे संपूर्ण साहाय्य आहे. अण्णासाहेब दाभोळकर तर केवळ निमित्त आहे. मीच माझे चरित्र लिहितो, माझी कथा मीच कथन करतो आणि माझी चरित्र लिहवून घेण्याची इच्छा मीच पुरवितो. त्याने आपली अहंकाराची भावना दाबून टाकावी आणि माझ्या चरणी ती अर्पण करावी. अहंकाराची भावना जेव्हा दबून जाते आणि तिचा ठावठिकाणाही उरत नाही तेव्हा त्याच्या मीपणात मीच संचार करतो आणि माझ्याच हाताने मी लिहितो.'' (ओ ७२-८६).

सर्व स्फूर्ती भगवंताचीच असते. भक्त केवळ निमित्तमात्र असतात. साधुसंत किंवा श्रीहरी कोणालाही हाताशी धरून, त्याच्या मस्तकावर आपला हस्त ठेऊन आपले चरित्र आपणच लिहवितात. गुरुशिवाय ज्ञान किंवा परमार्थ लाभणे शक्य नाही हे शास्त्राचे सांगणे साईबाबांनी दाभोळकरांच्या बाबतीत पक्के केले आणि साईचरित्रकार श्री गोविंद रघुनाथ दाभोळकर ''हेमाडपंत'' म्हणून नावारूपास आले.

**- श्री. प्रकाश यशवंत साळवी**
गोरेगांव (ई), मुंबई - ४०० ०६३



# एकनाथी भागवत

## (अध्यायानुरुप भावार्थ परिचय - अध्याय १६, १७, १८, १९)

## अध्याय १६

एकनाथी भागवताच्या एकूण ३१ अध्यायांपैकी १५ अध्याय झाल्यावर पुढे जाण्याआधी या अध्यायामध्ये आपण भागवताच्या मध्यावर आलो म्हणून नाथांनी मागील पंधरा अध्यायांचे प्रथम सिंहावलोकन केले आणि नंतर पुढे येणाऱ्या १६ अध्यायांचे विषय थोडक्यात समजावून दिले आहेत. अनिवार व अत्यंत शुद्ध, अखंड स्फूर्ती हा ज्यांच्या कृपेचा विशेष आहे त्या सदगुरुंच्या कृपारूपी शारदेची आपल्यावर पूर्ण कृपा झाली आहे असे नाथ आरंभी म्हणतात. (ही स्फूर्ती अत्यंत सर्जनशील असते व तिचे व्यक्त होणे साधकांच्या मनोरचनेवर अवलंबून असते. काही लोकांच्या जीवनात ती दिव्यकर्मांनी प्रकट होते तर काहींच्या जीवनात कलारूपाने प्रकट होते. संतांच्या जीवनात बहुधा काव्यरूपाने आणि नि:स्वार्थी प्रेमरूपाने ती प्रकटलेली आढळते. तिलाच शारदा म्हणतात.) यानंतर भगवंताच्या विभूतींचे सविस्तर वर्णन १६व्या अध्यायात आहे. संस्कृत 'भू' धातूला 'वि' हा उपसर्ग लागून विभूति हा शब्द बनतो. त्याचा अर्थ व्यापणे असा आहे. विभूति म्हणजे मायेच्या योगाने अनंत रूपांनी होणे. सामान्य माणसाला दिसणाऱ्या अनंत प्रकारच्या अनंत वस्तूंमध्ये एकच चैतन्य असले तरी काही वस्तूंमध्ये ते चैतन्य, आनंद विशेष ऐश्वर्याने विलसतो. विभूती शब्दाचा दुसरा अर्थ ऐश्वर्य असाही होतो. ते ईश्वरी ऐश्वर्य प्रकर्षाने जिथे विलसते ती विभूती. ईश्वराच्या सर्व व्यापकत्वाचा अनुभव घेण्याचा अभ्यास करण्यास हे विभूतींचे वर्णन अत्यंत उपयोगी आहे.

पूर्वी भगवद्गीतेमध्ये विभूतींचा विषय श्रीकृष्णांनी सांगितला. त्याचे स्मरण होऊन येथेही विभूतींचे वर्णन करण्याच्या आधी भगवद्गीतेचे तात्पर्य नाथांनी सांगितले आहे. युद्धाच्या वेळी अर्जुनाला देहबुद्धीच्या दृष्टीने ममत्वाचा मोह झाला. त्यापायी युद्ध करण्याची त्याची ऊर्मी लटकी पडली. कर्तेपणाचा अहंकार सर्व मोहांच्या मुळाशी असतो म्हणून मीपणा बाजूस ठेवून कर्म करावे असे श्रीकृष्णाने सांगितले. भगवंताला शरण गेले तरच कर्म करून अकर्तेपणा मिरविता येतो. म्हणून कर्म करण्याचा किंवा न करण्याचा आग्रह न धरता अर्पणबुद्धीने संसारात वागावे. हे वर्म ज्याला कळले तो देहात

असून विदेही बनतो. अशारीतीने गीतेचे तात्पर्य सांगून विश्वातील दृश्यांमध्ये व्यापकपणे खेळणारे ब्रह्म विभूतीरूपाने सांगितले आहे.

आत्मरूप दृष्टी आलेल्या पुरुषाला प्रत्येक दृश्यवस्तु विभूतीरूपाने भासते. प्रत्येक जीवाच्या हृदयामध्ये आत्मरूपाने परमात्मा वसतो. त्याची ओळखण ज्याला होते तोच भगवंताची श्रेष्ठ विभूती (सद्‌गुरु, संत) होय. त्याचप्रमाणे विश्वातील जी चेतना किंवा जी क्रियाशक्ती तीदेखील भगवंताचीच विशेष विभूती आहे. तसेच देवांना काय किंवा माणसांना काय, काळ मर्यादेत ठेवतो. त्या काळालाही मर्यादेत ठेवणारा महाकाळ भगवंताची विभूती आहे. या झाल्या विशेष विभूती. साधकाला उपासनेस उपयोगी पडणाऱ्या सामान्य विभूती सांगितल्या आहेत. ज्ञानप्रधान महत्तत्त्व, जीव, मन, वेदविचार, ओंकार, गायत्री, इंद्र, अग्नी, वामन, मनू, नारद, कामधेनू, कपिल, गरुड, दक्षप्रजापति, प्रल्हाद, कुबेर, चंद्र, ऐरावत, वरुण, सूर्य, राजर्षी, सुवर्ण, यमधर्म, वासुकि, अनंत, सिंह, संन्यास, ब्राह्मण, गंगा, महामेरू, हिमालय, अश्वत्थ, श्रीरामचंद्र, वसिष्ठ, ब्रह्मयज्ञ, अहिंसाव्रत, पावित्र्य, वृत्तिनिरोध, अध्यात्मविद्या, राजनीति, क्षमा, मौन, कृतयुग, द्वैपानव्यास, शुक्राचार्य, श्रीकृष्ण, उद्धव, अर्जुन, सुदर्शन, कमल, दान, सत्त्ववृत्ती, बल, भक्ती, शांती, तेज वगैरे सर्व भगवंताच्याच विभूती आहेत.

## अध्याय १७ व १८

आत्मज्ञानाची तहान असलेल्या माणसाने आपल्या जीवनात वर्ण आणि आश्रम दोन्हींची तत्त्वे आचरणात आणली पाहिजेत. त्या तत्त्वांचे सविस्तर वर्णन नाथांनी सतराव्या व अठराव्या अध्यायात केले आहे. हे दोन्ही अध्याय मिळून विषय एकच आहे.

**चार वर्ण :** विराटस्वरूप पुरुषोत्तमापासून चार वर्ण निर्माण झाले. ब्राह्मण म्हणजे मूर्तिमंत सत्त्वगुण. मानवी जीवनात जे अत्यंत पवित्र, दिव्य आणि अतिंद्रिय असल्याने चिरंजीव असते त्याची उपासना करणे हे ब्राह्मणांचे लक्षण होय. सत्त्वप्रधान रजोगुण हे क्षत्रियांचे लक्षण होय. या जगातीलच का होईना जे अत्यंत विशाल, सार्वजनिक, नि:स्वार्थी आणि उपयोगाचे असते त्याच्या संस्थापनेसाठी झगडा करणे हे क्षत्रियाचे काम आहे. रजप्रधान तमोगुण हे वैश्याचे लक्षण असल्यामुळे वैश्यवर्णाचा माणूस संपत्ती, ऐश्वर्य, दानधर्म, मोठेपणा इत्यादी व्यापारीवृत्तीचा प्रतिनिधी असतो.

तमोगुणांचे प्राबल्य हे शुद्रांचे लक्षण असल्यामुळे त्याची शक्ती, बुद्धी, युक्ती अगदी बेताची असतात. म्हणून शेती, पशुपालन, गोरक्षण, हलकेसलके धंदे करून तो जगतो. माणूस या दृष्टीने कोणताही वर्ण कमी किंवा अधिक नाही. जो मनुष्य अशुद्ध आहे, विकाराधीन आहे, चोर आहे आणि नास्तिक आहे तो अतिशूद्र समजावा असे नाथांनी स्पष्टपणे मांडले आहे. याउलट अहिंसा, सत्य, अक्रोध, लोभहीनता आणि सर्व भूतांवर प्रेम हे गुण सर्व वर्णांतील माणसांना अवश्य आहेत, असे ते म्हणतात.

**(१) ब्राह्मणाचे गुण : शम** = वैराग्याच्या सामर्थ्याने आणि गुरुवचनाच्या विश्वासाने मनाच्या वृत्ती सावरून त्याला आत्मस्वरूपात तल्लीन करणे. ब्राह्मणाच्या स्वभावामध्ये हा गुण स्वभावसिद्ध असतो. **दम** = विषयाचा जोर झाल्याने कर्मेंद्रिये सैरावैरा भडकतात. शास्त्रनियमांनी त्यांचे बंड मोडून देहाच्या निर्वाहापुरता त्यांना आहार देणे. शम हा राजा तर दम त्याची प्रजा होय. **तप** = लोभी निरंतर द्रव्यचिंतन करतो किंवा तरुण प्रिया प्रेमळ पतीचे चिंतन करते. त्याचप्रमाणे मनाने निरंतर आत्मस्वरूपाचा विचार करीत राहणे. शमाने ज्ञानेंद्रिये शांत होतात. शमदम साधून वेदोक्तकर्म करणे हे विशेष होय. परंतु हे प्रारब्धानुसार घडत असल्याने हृदयामध्ये भगवंताचे निरंतर चिंतन करणे हेच सर्व तपांमध्ये श्रेष्ठ तप होय. **पवित्रता** = अंत:करणामध्ये ज्ञानाचा निश्चय होऊन ते निर्मल होणे आणि देहाने वेदोक्त आचार पाळणे. **संतोष** = भगवंताच्या भक्तीने अंत:करणात स्वाभाविक सुख प्राप्त झाल्याने विद्यमान परिस्थितीमध्ये समाधान टिकणे, याला **तितिक्षा** असेदेखील म्हणतात. भगवंताचे सुख उदय पावले की लाभहानि, यशापयश, थंडीऊन, संपत्तीविपत्ती इत्यादी द्वंद्वांनी मन डळमळत नाही. त्या द्वंद्वांमध्ये भगवंतच आहे, ही भावना होते आणि त्यामुळे प्रपंचातील दु:खे मावळून जातात. **शांति** = अंत:करणात आत्मज्ञान उदय पावल्यामुळे तेथील कामक्रोधांचे ठाणे उठणे, शांत मनुष्याचा कोणी अपराध केला तरी त्याचे त्याला काही विरुद्ध असे वाटतच नाही. उलट नवल असे की, तो अपकाऱ्यावर उपकारच करतो. **आर्जव** = लबाडाशी लबाडीनेच वागावे असे शिकविले तरी मनामध्ये कुटिलपणा न येणे. **देवाची भक्ती** = दृश्यवस्तूंचा स्वार्थ सोडून भगवंतावर जिवाभावाने प्रेम करणे. ज्याप्रमाणे सर्व पिकांना पृथ्वीचा आधार असतो, त्याचप्रमाणे या सर्व गुणांना भक्तीचा आधार असतो. साधूमधे प्रकट होणाऱ्या सर्व सदगुणांची जन्मभूमि एक भक्तीमात्रच आहे. जिवाभावाने भक्ती करणाऱ्यावर भगवंतदेखील मनापासून प्रेम करतो व त्याच्या

अधीन राहतो. नि:स्सीम भाविकपणाची अवस्था याचेच नाव भक्ती. **दया** = कोणी दीन दृष्टीस पडला की, त्याच्या सहाय्याकरिता तत्काळ उठणे. दयावंत पुरुषाला दुसऱ्याचे यत्किंचितही दु:ख सहन होत नाही. आपले आणि परके किंवा स्वजाति आणि परजाति हा विचार करण्याइतका धीर त्याला नसतो. दयाळू मनुष्य जगात धन्य होय. त्याने भगवंताला विकत घेतलेले असते. भगवंत त्याच्या अधीन झालेला असतो. दयाशील माणसावर येणाऱ्या प्रसंगामध्ये भगवंत जातीने मदत करतो. **सत्य** = जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्ये भगवंताचा विसर न पडणे, अशा माणसाला सगळीकडे एकच सत्य दिसल्याने त्यांची वाणी आणि दृष्टी भगवंताने भरून जाते.

(२) **क्षत्रियाचे गुण : तेज** = प्रतापाचे सामर्थ्य. **बल** = एकट्याने लाखो मनुष्यांवर तुटून पडण्याचे सामर्थ्य. तो रणांगणांत शिरला म्हणजे देहभान विसरतो आणि दुसऱ्याचे सहाय्य आपल्याला आहे किंवा नाही याचा विचार त्याला सुचत नाही. **धैर्य** = सर्व बाजूंनी संकटे कोसळली तरी चित्ताला धाक न वाटणे. धैर्यवान मनुष्य सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांमध्ये पारंगत असून केवळ धर्मयुद्ध करतो. **शौर्य** = आपल्या शत्रूंचे नावसुद्धा उरू न देणे. सारी पृथ्वी निर्वैर करून टाकणे. मृत्यू हा सर्वात मोठा शत्रू आहे. त्यालाच तो मुळी नाहीसा करून टाकतो. रणांगणांत एकदा समोरासमोर आल्यानंतर तो पाऊल मागे घेत नाही. तसेच जो बेसावध किंवा नि:शस्त्र असेल त्याला तो मारत नाही. **सहिष्णुता** = शस्त्रांचे घाव अंगावर आदळले किंवा विषारी बाण अंगात घुसले तरी रणांगणातून माघार न घेणे. यशापयशाचे सुखदु:ख क्षत्रियाच्या चित्ताला बाधत नाही. **औदार्य** = याचकाचे मन तृप्त होईपर्यंत सर्वस्व दान देत राहणे. देशकाल व सत्पात्र पाहून मनात कोणताही किंतु न आणता सन्मानपूर्वक आणि विधियुक्त पुष्कळ दान करायचे हा क्षत्रियांचा स्वाभाविक गुण आहे. याचेच नाव उदारपण होय. **उद्यम** = परमार्थप्राप्तीसाठी स्वधर्मनिष्ठेला अनुसरून प्रयत्न करणे. आपला जीव धोक्यात घालून गोब्राह्मणांचे म्हणजे साधुसंतांचे संरक्षण करणे, स्वधर्माने प्रजेचे पालन करणे आणि कोणासही उपद्रव न देता पृथ्वीचे रक्षण करणे याला उद्यम म्हणतात. **स्थैर्य** = सज्जनांचे संरक्षण आणि स्वधर्माने प्रजेचे पालन करीत असता मनाला कंटाळा न येणे. **संतभक्ती** = ब्रह्मभावाने आपल्या सद्‌गुरुंचे भजन करणे, सदगुरु मानव जरी दिसले तरी ते भगवत्स्वरूप आहेत ही भावना धरून जो वागेल त्या क्षत्रियाला आपोआप ऐश्वर्य प्राप्त होते. **ऐश्वर्य** = संतसेवेमुळे परमात्मा स्वाधीन होणे. संताच्या

सेवेने ब्रह्मसुख पायाला लागते व सर्व सत्ता हाती येते. धनधान्याची समृद्धी होऊन प्रजा अत्यंत सुखी होते.

**(३) वैश्याचे गुण : आस्तिक्य** = वेदशास्त्रावर अत्यंत विश्वास असणे, वैश्याला स्वाभाविकपणे मोठा द्रव्यलोभ असतो. म्हणून वेदाने सांगितलेल्या स्वधर्माचे अगदी मनापासून पालन करणे हे त्याचे आस्तिक्य होय. **दाननिष्ठा** = प्राणांतसमय प्राप्त झाला तरी दान देण्यामध्ये खंड न पडू देणे. **सद्‌गुरुसेवा** = सद्‌गुरुंची आज्ञा प्रमाण मानणे. सद्‌गुरुला परमात्मस्वरूप मानून त्याच्या सेवेसाठी तनमनधन खर्ची घालणे. **निर्दंभता** = लोकांत मान्यता व्हावी किंवा आपली प्रतिष्ठा वाढावी ही कल्पना टाकून संतसेवा करणे, निष्कपटपणे तसेच निर्लोभपणे संतांची सेवा केली असता वैश्य स्वभावाच्या माणसाला परमार्थप्राप्ती होते.

**(४) शुद्राचे गुण** = शुद्र स्वभावाच्या माणसाचा मुख्य गुण म्हणजे त्याने निष्कपटभावाने संतांची सेवा करावी. त्यांच्या गाई राखाव्यात, त्यांना गवत व पाणी द्यावे. हिंस्त्र पशूंपासून रक्षण करावे. देवालयातील अंगण झाडून, सारवून तेथे सडासंमार्जन करावे. ज्या वेळेला जे मिळेल तेवढ्यात संतोष मानून आपला चरितार्थ चालवावा. अशानेच त्याला मोक्षप्राप्ती होते.

**३. सर्वसामान्य गुणावगुण :** चार वर्णांचे गुण स्वभावानुसार नाथांनी वर्णन केले खरे; परंतु माणूसपणाच्या दृष्टीने काही गुण प्रत्येक व्यक्तीने घेणे जसे जरूर असते तसेच काही अवगुण टाकणे अवश्य असते. त्या गुणावगुणांचे थोडके वर्णन नाथ करतात.

**गुण : अहिंसा** = दुसऱ्याला सुख होईल तो उपाय करणे. **सत्य** = तिन्ही अवस्थांत मन आणि वाणी असत्यापासून दूर ठेवणे. **अस्तेय** = जे खरे आपले नाही त्याची चुकूनसुद्धा वासना न धरणे. **अकाम** = कामवासनेला जागृत राहून ताब्यात ठेवणे. **अक्रोध** = चिडण्याचे कारण होऊनदेखील मनात रागाची खळबळ न होणे. **अलोभता** = योग्य प्रयत्नाने जेवढे मिळेल त्यामध्ये समाधान राखणे. **भूतहित** = आपल्याला शक्य असेल तितके प्राणीमात्रांचे हित करीत राहणे. हे गुण आचरून जो जीवन जगतो त्याच्या मदतीला भगवंत हरघडी धावतो.

**अवगुण : अशौच** = मन विकल्पांनी भरलेले आणि शरीर मलाने भरलेले असणे. **अनृत** = स्वभावामध्ये दुसऱ्याला फसविण्याची बुद्धी असणे. लबाड मनुष्य परोपरीने विश्वास दाखवून गुरूंचे गाठोडे लांबवतो. **चोरी** = दुसऱ्याचे डबोले हाती येण्यासाठी

वाटेल तो अनाचार करणे. **नास्तिकपणा** = स्वधर्मकर्मावर स्वभावत: विश्वास नसणे. असला मनुष्य वेद, शास्त्र, पुराणे आणि संत यापैकी कोणावरच विश्वास ठेवत नाही. **शुष्क भांडण** = कारणांवाचून उगीच भांडण करणे. काहीएक संबंध नसता दुसऱ्याचा छळ करणे आणि सदासर्वदा कटकटी निर्माण करणे. हा दुष्टांचा स्वभावच असतो. सज्जनांना संकटांत घालून दुसऱ्याचा नाश करण्याची बुद्धी पोटात धरणे याला शुष्क भांडण म्हणतात. **काम, क्रोध व लोभ** = अनिवार कामवासना असणे. पैशांचा भयंकर लोभ असणे आणि वृत्ती सदासर्वदा जळफळलेली असणे. **असंतोष** = कितीही सुख मिळाले तरी भोगवासना तृप्त न होणे.

आत्मज्ञान करून घेणे हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचे प्रधान ध्येय आहे असे संत सांगतात. पण कोणतीही व्यक्ती समाजाशिवाय जगू शकत नाही. अर्थात ज्या समाजात आत्मज्ञानाला पोषक अशी व्यवस्था असते तो समाज अधिक चांगला असे म्हणायला हरकत नाही. भारतीय विचारवंतांनी वरील दृष्टी ठेवून जी समाजरचना प्रतिपादली आणि जी जीवनपद्धती वर्णन केली तिला वर्णाश्रमधर्म असे म्हणतात. कोणत्याही समाजात चार प्रकारची माणसे असतात. केवळ ज्ञानोपासनेची हौस असणारी, धाडसीपणाने देहावर उदार होऊन दुसऱ्याला मदत करणारी, पैसाअडका, घरेदारे, शेतीवाडी वगैरे संपत्ती मिळवून देहसुखाच्या नादी लागणारी आणि केवळ देहभरण करून जगणारी असे माणसांचे चार प्रकार असतात. त्यांना ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशी नावे दिलेली आहेत. कोणताही व्यक्ती एका वर्णातून दुसऱ्या वर्णात जाऊ शकत असे, परंतु कालांतराने वर्णांच्या जाती बनल्या आणि मूळ समाजधारणेमध्ये दोष उत्पन्न झाला.

सांगण्याचा मुद्दा असा की, पूर्वकर्मानुसार मनुष्य चार वर्णांपैकी एखाद्या वर्णाचे गुण म्हणजे अनुवांशिकता घेऊन जन्मास येतो. अर्थात माणूस म्हणून तो कमी किंवा जास्त नाही. जे गुण आपल्याला मिळाले त्यांचा उपयोग करून आत्मज्ञानाच्या मार्गावर वाटचाल करणे हे समाजातील प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे असा मोठा उदार दृष्टीकोन नाथांनी ठेवला आहे.

जीवनक्रमाच्या दृष्टीने मानवी जीवनाच्या चार अवस्था सांगितल्या आहेत. त्यांना आश्रम असे म्हणतात. पहिला ब्रह्मचर्याश्रम. या आश्रमात जीवनाला उपयोगी पडणारी विद्या संपादन करायची असते. तसेच देहाला आणि मनाला उत्तम सवयी लावून घ्यायच्या असतात. दुसरा गृहस्थाश्रम. ज्यांना विद्या मिळविण्यासाठी पूर्ण स्वातंत्र्य

पाहिजे अशा स्त्री-पुरुषांनी जन्मभर ब्रह्मचर्याश्रमात राहिले तरी हरकत नाही. ब्रह्मचर्याश्रमातून एकदम संन्यासाश्रमात पाऊल टाकणारी माणसे आढळून येतात. पण सर्वसाधारण माणसाचा हा मार्ग नव्हे. म्हणून ब्रह्मचर्याश्रमानंतर आपल्याला योग्य अशा कुलशीलवान तरुणीशी लग्न करून संसार करावा असे शास्त्र सांगते. आश्रमात गृहस्थाश्रमाला विलक्षण महत्त्व आहे, कारण दुसरे तीन आश्रम अखेर त्याच्यावर अवलंबून राहतात. इतकेच नव्हे, तर एकंदर समाज सुखी आहे का दु:खी आहे, सुसंस्कृत आहे का असंस्कृत आहे, सज्ञान आहे का अज्ञान आहे हे ठरविण्यास त्यातील कुटुंबसंस्था तपासून पाहाव्या असे समाजशास्त्रज्ञ म्हणतात. गृहस्थाश्रमांत देखील जीवनाला एक प्रकारची शिस्त हवी. मध्यम वय झाल्यावर वानप्रस्थाश्रम सुरू होत असल्याने त्या शिस्तीचा फार उपयोग होतो. वानप्रस्थात आत्मानुसंधान ठेवण्याचा आणि वाढविण्याचा अभ्यास करायचा असतो. त्यासाठी प्रपंचाच्या दैनंदिन कृत्यांमधून निवृत्त व्हावे लागते. आसक्ती कमी होऊन हे अनुसंधान पक्के झाले म्हणजे संन्यासाश्रमात प्रवेश करायचा असतो. संन्यासी म्हणजे देहबुद्धी नष्ट झालेला, विकार निर्मूल झालेला आणि सर्व भूतांवर प्रेम करणारा साधुपुरुषच होय. जो मनुष्य लहानपणापासून आश्रमांचे नियम बरोबर पाळील त्याला वाढत्या वयाबरोबर आपोआप आत्मज्ञान होईल याबद्दल संशय बाळगायचे कारण नाही, परंतु काळ बदलल्यावर वर्णांच्या जाती बनून समाजरचनेत दोष उत्पन्न झाले, त्याचप्रमाणे आश्रमांचे मूळ तत्त्व आणि स्वरूप लोपले. अर्थात जीवनातील शिस्त एक नाहीशी तरी झाली किंवा जेथे उरली तेथे तिला विकृत स्वरूप प्राप्त झाले.

## गृहस्थाश्रमाचें महत्त्व

चारही आश्रम आपापल्या परीनें चांगलेच आहेत यात शंका नाही. परंतु त्यातला त्यात गृहस्थाश्रम हा व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीने अधिक विधायक आहे असे नाथांचे स्पष्ट मत आहे. तिन्ही आश्रमांना गृहस्थाश्रम थारा देतो; इतकेच नव्हे तर इतर आश्रमांचा दृष्टिकोन गृहस्थाने ठेवला तर प्रपंचात राहून ब्रह्मानुभवाची सर्वांत वरची पायरी गाठता येते. या अवस्थेला ते परमभक्ति म्हणतात. शिवाय नैष्ठिक ब्रह्मचर्य आणि खरा संन्यास या दोन्हींचे अधिकारी केव्हाहि विरळच असतात. बहुजनसमाज गृहस्थाश्रमाचाच अधिकारी असतो. हे जर खरे, तर गृहस्थाश्रमच अध्यात्मदृष्ट्या

जितका उत्तम करता येईल तेवढा करण्याचा प्रयत्न करणे हे समाजाच्या कोणत्याहि परिस्थितीत श्रेयस्कर ठरते. नाथांनी स्वतः असा आदर्श गृहस्थाश्रम करून दाखविला म्हणून त्यांच्या सांगण्याला प्रत्यक्ष अनुभवाचा पाया आहे. अठरावा अध्याय इथे संपतो.

## अध्याय १९

वर्णाश्रम धर्माचे वर्णन संपूर्णपणे झाल्यावर १९व्या अध्यायात ज्ञानविज्ञानाचे लक्षण भगवंताने सांगितले. आत्मज्ञान केंद्रस्थानी ठेवूनच नाथांनी या विषयाची फोड केली आहे. ते समजून घेण्याआधी सामान्यपणे ज्यास आपण हल्ली ज्ञान-विज्ञान म्हणतो ते पाहू.

मानवी जीवनात ज्ञानाला केव्हाही अत्यंत महत्त्व असते. ज्ञान म्हणजे वस्तूचे यथार्थ स्वरुप कळणे. ते कळले म्हणजे वस्तू ताब्यात आणण्याचे सामर्थ्य आपोआप येते. माणूस जगताचे पुष्कळ ज्ञान मिळवतो. त्यामुळे वस्तूवर ताबा आणून परिस्थितीवर ताबा मिळवू पाहतो. या ज्ञानालाच सध्या विज्ञान म्हणतात.

या विज्ञानाने मिळालेल्या सामर्थ्याचा उपयोग करणारा जो 'मी' त्याचे यथार्थ स्वरुप कळल्याशिवाय मानवी जीवनात खरे समाधान प्राप्त होत नाही. म्हणून आधी स्वतःचे ज्ञान करून घ्यावे असा एकनाथादिक साऱ्या संतांचा आग्रह असतो. या आत्मज्ञानालाच मुख्य मानून नाथ म्हणतात, की तर्क वा श्रवणाने जीव व परमात्मा एकच आहेत हे जाणणे म्हणजे ज्ञान आणि त्या स्वरुपाचा साक्षात् अनुभव येणे म्हणजे विज्ञान.

आपल्या स्वस्वरुपाचे म्हणजे परमात्म्याचे ज्ञान करून घेणे हे निश्चित झाले, जीवन ध्येय बनले की, ज्या मानाने माणसास याचा नाद लागतो त्या मानाने तो आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी वा ज्ञानी भक्त बनतो. यासाठी प्रथम दृष्याची आसक्ती सुटून दृष्यामध्ये खरा आनंद मिळणे शक्य नाही असा निश्चय होणे म्हणजेच ''वैराग्य'' आवश्यक असते. ही विरक्ती धारण करतो त्यालाच भगवंताच्या भक्तीचे रहस्य उलगडते.

## भक्तीचीं लक्षणे

विश्वाला धारण करणारी आणि त्यातील सर्व व्यवहार आपल्या सत्तेने पार पाडणारी जी चिच्छक्ति, तिच्याशी सर्वस्वीं एकरूप होऊन जाणें ही खरी भक्ति होय. वास्तविक

ही तादात्म्याची अवस्था आपली मूळची स्थिती असल्याने नाथांनी तिला सहजस्थिती असे नाव दिले आहे. पण ही स्थिती अनुभवास येण्यास साधकाला अलीकडील अवस्थांमधून जावे लागते. त्या अवस्था तीन आहेत. पहिली आर्तता. प्रापंचिक जीवनांत खरे सुख मिळत नाहीं हा एकदा अनुभव आला म्हणजे साधकाच्या मनामधे भगवत्प्राप्तीची तीव्र तळमळ उत्पन्न होते. याचें नाव आर्तता. दुसरी जिज्ञासा. भगवंताची प्राप्ति कोणत्या मार्गाने होते हे समजण्यासाठी साधक पूर्वी होऊन गेलेल्या भक्तांच्या जीवनाचा अभ्यास करतो. पूर्वीच्या भक्तांनी भगवद्भक्ती संपादन करण्यास कोणत्या साधनाचा अवलंब केला हे समजून घेणे आणि आपल्याला साध्य असेल त्या मार्गाने जाण्याचा अभ्यास सुरू करणे याचे नाव जिज्ञासा. तिसरी अर्थार्थी. या दृश्य विश्वामध्ये अनेक प्रकारच्या वस्तु दृष्टीस पडतात. त्या सर्व अशाश्वत असल्याने परमार्थाला उपयोगी पडत नाहीत. म्हणून मनाने त्या सर्वांहून बाजूला सरून जो आपले सारे लक्ष भगवंताकडे लावतो तो खरा अर्थार्थी.

भगवंताची गोडी उत्पन्न होण्यास भगवंताच्या अमृतमय कथा प्रथम श्रवण कराव्या. त्याचे गुण व चरित्र मनापासून ऐकता ऐकता मन त्यामध्ये रमू लागते. मग कीर्तनाची आवड उत्पन्न होते. भगवंताचे नाम मोठ्या आनंदाने गाऊ लागून भक्त परमानंदाने डोलू लागतात. देहाने होणारे प्रत्येक कर्म भगवंताच्या स्मरणात होऊ लागते. त्याची इंद्रिये पूजेमध्ये गुंततात, वाणी नामस्मरणात रंगते आणि हृदय ध्यानात मग्न होते. असे अनेक भक्त एके ठिकाणी जमल्यावर नामघोषाला आणि आनंदाला पूर येतो. त्या आनंदामध्ये भक्ताचा अहंकार पूर्णपणे विलीन होऊन तो स्वस्वरुपांत स्थिर होतो. हाच भक्तीचा खरा मार्ग होय. आर्त, जिज्ञासू आणि अर्थार्थी हे भेद आपोआप नाहींसे होऊन सहजस्थिति असणारी चवथी भक्ती तेवढी शिल्लक उरते. लोखंड कमावून त्याला पॉलिश केले म्हणजे जसा त्याचा आरसा होतो किंवा वस्त्र धूत गेले म्हणजे ते पूर्ण स्वच्छ होते, त्याप्रमाणे सारी कर्मे भगवंताला अर्पण केली म्हणजे मनदेखील अत्यंत निर्मळ होते. ते निर्मळ झाले की, लगेच स्वस्वरुपांत लीन होते. ज्याला ही भक्ति साधते त्याचे सर्व व्यापार भगवतस्वरूप होऊन राहतात. जिकडे पाहावे तिकडे त्याला आत्मस्वरूपाशिवाय दुसरे काहीही दिसत नाही. देहाच्या दृष्टीने तो माणूस दिसला तरी तो परमात्मस्वरूपच झालेला असतो.

(क्रमश:)

★★★

# मला विचाराल तर



**★ असं दिसून येतं, की काही तथाकथित साधू-संन्यासी, फकीर, यांच्याकडे काही छोट्या-मोठ्या सिद्धी असतात, त्यांना या शक्तींचा गर्व असतो आणि त्यांचे दंभपूर्वक, चमत्कारिक प्रदर्शनही ते करतात. याबाबतीत आपला अभिप्राय काय?**

खूप कमी लोकांना खऱ्या सिद्धी प्राप्त होतात. या सिद्धी सुद्धा निसर्गशक्तीच असतात, ज्यांचे कार्य अद्‌भुत असते. आपण ज्यांचे चमत्कारिक प्रदर्शन पाहतो त्यात ईश्वरी शक्ती नसतात, तर त्या असतात अतिशय हीन दर्जाच्या तंत्र-मंत्रादि विद्या. ज्याला खरी शक्ती म्हणतात, ती ईश्वरी शक्ती असते आणि तिचा हेतू सामूहिक कल्याण हाच असतो. जोपर्यंत अहंकार आहे तोपर्यंत ईश्वरी शक्ती प्राप्त होणे शक्य नाही. अहंकार नष्ट झाल्यावरच ईश्वरी शक्तीचा आविर्भाव होतो. लोकांवर छाप पाडण्यासाठी किंवा दुसऱ्याचं वाईट करण्यासाठी अशाप्रकारचे दांभिक चमत्कार-प्रदर्शन हे अगदी अनुचित आहे. जर कुणी या सिद्धींचा, शक्तींचा असा अनुचित प्रयोग केला तर त्या शक्ती त्या व्यक्तीचा विनाश घडवून त्याच्यापासून दूर जातात.

ज्यांच्याकडे खरोखर ईश्वरी शक्ती असतील त्यांना त्यांचा तिळमात्र दंभ असणार नाही. सद्‌गुरुंच्या हाताची मूठ घट्ट मिटलेल्या स्थितीत असते, त्यात विश्वाचे मूळ कारण अशा अगणित दिव्य शक्ती असतात. ती मूठ कधी खोट्या चमत्कार प्रदर्शनाकरता वा अमंगलाकरता उघडत नाही. ही गोष्ट वेगळी की आर्तपीडितांच्या कल्याणासाठी अनेकदा त्यांच्याकडून अनेक आश्चर्यकारक घटना घडतात आणि लोक त्याला चमत्कार म्हणतात. परंतु सद्‌गुरुंना मात्र त्या इतरांना अलौकिक वाटणाऱ्या गोष्टींचा पत्ताही नसतो. ते सिद्धींच्या मागे नसतात तर सिद्धी त्यांच्या पाठीमागे चालत असतात. त्यांचा उद्देश केवळ प्राणिमात्रांचे कल्याण हाच असतो.

**★ अध्यात्म मार्गाकडे माणसाची प्रगती झपाट्याने कशी होईल?**

केवळ वाचून, ऐकून किंवा वेळेचे व्यवस्थापन करून कुणाची अध्यात्म मार्गावर प्रगती होत नसते. वाचन, श्रवण इ. नी प्राप्त झालेले ज्ञान जर आचरणांत आणले नाही तर

ते निरुपयोगी आहे. निरहंकारी होणे, दुसऱ्यासाठी त्याग करणे अशी जी अध्यात्म मार्गातील आचरसहिंता आहे तिचे पालन करणे सोपे नाही. यासाठी सद्‌गुरुवर श्रद्धा, ईश्वर निष्ठा आणि इच्छा शक्ती यांची नितांत आवश्यकता आहे. प्रभू किंवा सद्‌गुरुच्या चरणी संपूर्ण शरण गेल्यास या मार्गावर चालणे सोपे जाते. संसारी माणसाने साधू, योगी किंवा मुक्त होण्याचा किंवा कुंडलिनी जागविण्याचा प्रयत्न करू नये. या गोष्टींचा अर्थ न जाणता उपयोग करणे मूर्खपणाचे आहे. ईश्वरावर अचल श्रद्धा ठेऊन बाबांची सतत प्रार्थना करावी की, निसर्गनियमानुसार आपली या मार्गावर वाटचाल व्हावी. आपण कर्ता नाही हे ही समजून असावे. कर्तृत्वाचा विचार पूर्ण सोडावा. हा कर्तृत्व विचार आपला अहंकार वाढवतो आणि तो सहजी जात नाही. सद्‌गुरु अथवा प्रभू यांनी दाखवलेल्या मार्गाने चालत असता सद्‌गुरुला वाटले तर सिद्धी किंवा मुक्ती देतील पण आपल्या मर्यादित आणि अस्पष्ट कल्पनांनी त्यांचा हव्यास करू नये.

**★ वाऱ्याच्या एखाद्या तडाख्याने सद्‌गुरुंवरची आमची श्रद्धा कधी डळमळते. ते कसे रोखावे आणि पुनः तसं होऊ नये म्हणून काय करावे?**

ज्यांना सदगुरुंच्या निकट जायचे आहे त्यांनी चांगल्या, वाईट किंवा तटस्थ कशाही परिस्थितीत बाबांवरची अढळ श्रद्धा तशीच ठेवली पाहिजे. परंतु काही लोक सद्‌गुरुकडे भौतिक लाभाच्या अपेक्षेने येतात किंवा मनात तशी इच्छा ठेवून भक्ती प्रदर्शित करतात. जेव्हां केव्हां त्यांच्या इच्छा पूर्ण होत नाहीत किंवा त्यांच्याच पूर्वकर्मामुळे त्यांना अडचणी येतात तेव्हां ते गुरुला दोष देतात व त्याच्यावरची श्रद्धा पातळ करतात. कोणत्याही अवतार काळी किंवा सद्‌गुरुकडून प्रत्येक व्यक्तीची प्रत्येक इच्छा कधीच पूर्ण होत नसते. भक्तांच्या आध्यात्मिक प्रगतीच्या आड येणाऱ्या कोणत्याही इच्छा सद्‌गुरु पूर्ण करीत नाही. भक्तांच्या इच्छा पूर्ण होण्यात अथवा न होण्यात त्यांचाच हात दिसून येतो. म्हणून सद्‌गुरुंना दुःखात वा सुखात जो अनुभवू शकतो तोच खरा भक्त होय. सुखाला शोधणारे आपल्या मार्गापासून भ्रष्ट होऊ शकतात कारण त्यांना सद्‌गुरुचे प्रेम नव्हे तर भौतिक लाभ हवा असतो.

**- श्री. चंद्रभानु सतपथी**
नवी दिल्ली

# प.पू. श्री. वासुदेवानंद सरस्वती रचित वैशिष्ट्यपूर्ण स्तोत्रे

दत्तसंप्रदायाची वाङ्‌मयमूर्ती असे ज्यांच्याविषयी म्हटले जाते त्या प.पू. श्री. वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबेस्वामींचे समाधी शताब्दी वर्ष नुकतेच साजरे झाले. १३ ऑगस्ट १८५४ (जन्मस्थळ माणगाव) ते २४ जून १९१४ (समाधीस्थळ गरुडेश्वर) हा त्यांचा जीवनकाळ. या काळात श्री गुरुचरित्र द्विसाहस्त्री सटीकम्, समश्लोकी संस्कृत गुरुचरित्र, श्रीदत्तपुराण, श्री दत्तमहात्म्य, शिक्षात्रयम्, युवाशिक्षा, वृद्धशिक्षा, सप्तशगुरुचरित्र इत्यादी विपुल ग्रंथरचना ईश्वरी प्रेरणेने (दत्तप्रभुंच्या प्रेरणेने) त्यांच्या सिद्ध-प्रज्ञेतून स्फुरली. सामान्य साधकांसाठी त्यांनी लिहिलेल्या स्तोत्रांची संख्याही जवळजवळ २०० इतकी आहे. या सर्व रचना प्रासादिक तर आहेतच, पण त्यातील काही वैशिष्ट्यपूर्णही आहेत. सप्तशति गुरुचरित्र हा ७०० ओव्यांचा गुरुचरित्रातील कथांचा संग्रह असलेला मराठीतील ग्रंथ. याचे वैशिष्ट्य असे की, याच्या प्रत्येक ओळीतील तिसरे अक्षर सलग वाचले असता तयार होतो श्री भगवद्‌गीतेचा पंधरावा अध्याय! अशीच स्वामींनी रचलेली काही समंत्रक स्तोत्रे आहेत. स्तोत्रांमधील प्रत्येक ओळीतील ठराविक अक्षर क्रमाने वाचल्यास एखाद्या देवतेचा सिद्धमंत्र तयार होतो. अशीच दोन स्तोत्रे खाली दिलेली आहेत.

**समंत्रकं श्रीगणपतिस्तोत्रम्**

नमो गणपते तुभ्यं ज्येष्ठ ज्येष्ठाय ते नमः ॥
स्मर णाद्यस्यते विघ्ना न तिष्ठन्ति कदा चन ॥१॥
देवा नां चापि देवस्त्वं ज्येष्ठ राज इति श्रुतः ॥
त्यक्त्वात्वा मिह कः कार्यसिद्धीं जंतुर्गमिष्यति ॥२॥
सत्वं गणपतिः प्रीतो भव ब्रह्मादिपूजित ॥
चरण स्मरणात्तेपि स्युर्ब्रह्माद्या यशस्विनः ॥३॥
परा परब्रह्मदाता सुराणां त्वं सुरो यतः ॥
सन्मतिं देहि मे ब्रह्मपते ब्रह्मसमीडित ॥४॥
उक्तं हस्तिमुखश्रुत्या त्वं ब्रह्म परमित्यपि ॥

कृतं वाहनमाखुस्ते कारणन्त्वत्र वेद तो ।।५।।
इयं महेश ते लिला न पस्पर्श यतो मति: ।।
त्वां न हेरंब कुत्रापि पर तन्त्रत्वमीश ते ।।६।।
सत्त्वं कवीनां च कविर्देव आद्यो गणेश्वर: ।।
अरविंदाक्ष विघ्नेश प्रसंन: प्रार्थनां श्रृणु ।।७।।
त्वमेकदन्त विघ्नेश देव श्रृण्वर्भकोक्तिवत् ।।
सत्कवीनां मध्य एवं नैकाण्वंश कविं कुरु ।।८।।
श्रीविनायक ते दृष्ट्या कोपि नू नं भवेत्कवि: ।।
तं त्वा मुमासुतं नौमि सन्मति प्रद कामद ।।९।।
ममापराध: क्षंतव्यो नतिभि: संप्रसीद मे ।।
न नमस्यांविधि जाने त्वं प्रसीदाद्य केवलं ।।१०।।
न मे श्रद्धा न मे भक्तिर्न त्वदर्चन पद्धति: ।।
ज्ञाता वदान्य ते स्मीति ब्रुवे साधनवर्जित: ।।११।।
कर्तुं स्तवं च तेनीश: प्रसीद कृपयोद्धर ।।
प्रणामं कुर्वेऽऽतोऽऽनेन सदानंद प्रसीद मे ।।१२।।

इति श्री. प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीविचरितं
समंत्रकं श्री गणपति स्तोत्रं संपूर्णम् ।

प्रत्येक ओळीतील तिसरे अक्षर
ग णा नां त्वा ग ण प तिं ह वा म हे क विं‍क वी ना मु प म श्र व स्त मं।
व प्रत्येक ओळीतील ११ वे अक्षर
ज्ये ष्ठ रा जं ब्र ह्मा णां ब्र ह्म ण स्प द आ न: श्रृ ण्वं नू ति भि: सि द सा द नं।
दोन्ही मिळून तयार होतो. गणेश सिद्धमंत्र.
आता पाहूया अन्नपूर्णास्तोत्र. यातील किमया तर अधिकच स्तिमित करणारी आहे.

**श्री अन्नपूर्णास्तोत्रम**

श्री देवि दर्शनीयेंऽशा ऐंद्ज्याद्या अंबिके तव ।।
भव्ये दत्ताभये ताभि र्‍हीं बीजे नतानव ।।१।।
गत्यै मात्रे नमस्तेतु श्रीं गाये पूर्ण संविदे ।।
वस मे योगिनि स्वांते क्लीं मयेर्णेश्वरेश्वरी ।।२।।

दक्षे सहस्रवक्त्रस्ते न वेत्ति स कलान्गुणान् ।।
वदेत्कोरिष्टदे सर्वान् मोक्षसंदात्रि ते गुणान् ।।३।।
धूताद्ये कृपया पाहि भगवत्पूज्य पादुके ।।
तम: पूष्ण इवाविद्या गतापर्णे तवेक्षणात् ।।४।।
पतिता उद्धृतास्ते हि वरदे शंकरप्रिये ।।
दया जन्महरा चेत्ते तिष्ठेद्धि कथमावृत्ती: ।।५।।
कस्ते चित्तार्तिहे वेत्ता मान्येऽमरमनोतिगे ।।
मम ज्ञानं कियत्प्राज्ञि हे शंभु प्राणवल्लभे ।।६।।
लसद्वेदनुते द्वास्थ श्ववद्गणय मामुमे ।।
भ्रमप्रदार्थवादा येरिप्राया वञ्चितोस्मि तै: ।।७।।
मर्त्योर्भो य इहांबाया अंके संल्लभतेर्थितम् ।।
रक्षिता कश्च ये ह्यार्ये न तेर्भोभेददर्शिनी ।।८।।
वासना मुक्तिकृद्देवि पूर्णविज्ञानदायिनी ।।
सुखदे नित्यमांगल्येर्णेशे ध्यानमुपाविश ।।९।।
देवा अर्दित शांत्यर्थमलं ते वै त्वदीरिता: ।।
वासनागंधो मे नास्तु मानादेरार्तिदोत्र य: ।।१०।।
नंदिनी बलिनी ब्राह्मी भिक्षाभाग्यविवर्धिनी ।।
दयाब्धिरोजस्विनीड्या लक्ष्मीसत्वं सिद्धिरूपिणी ।।११।।
सत्येस्यंबा कृपां भोषिषिज्चात्र ध्यधिपालके ।।
रक्ष्यो बाल: स्वको मात्रा तत्त्वतोर्थं वदामि ते ।।१२।।
स्वल्पज्ञोपि शठोदांतो मंदो वाऽभिमतोपि वा ।।
तीव्रमाशापरो वायं न चोपेक्षां शिवेर्हति ।।१३।।
भिया न चोक्तवान् शब्दान्देवेड्ये देहि कांक्षितम् ।।
क्षुच्छांत्यै ज्ञानभिक्षान्नं हितज्ञे हितमर्पय ।।१४।।
कृपयानस्तमितया देहि ते चरणे रतिम् ।।
तपोदे सादरं याचे हितं मे पारदे कुरु ।।१५।।
स्तवे तेंग ह्यशक्तं मां स्वान्ते शर्वप्रिये स्मर ।।
वर्ये वर: स एवार्थ्यो हार्दज्ञेतिथिवल्लभे ।।१६।।

प्रत्येक ओळीतील पहिले अक्षर

श्रीभगवदवधूत पदकमलभ्रमर वासुदेवानंद सरस्वती भिक्षुकृतस्तव

प्रत्येक ओळीतील चौथे अक्षर

दत्तात्रेयो हरि कृष्ण उन्मत्तानंददायक: मुनिर्दिगंबरो बाल: पिशाचो ज्ञानसागर:

प्रत्येक ओळीतील नववे अक्षर

ऐं ऱ्हीं श्रीं क्लीं नमो भगवति माहेश्वरि अंनपूर्णे ममाभिलषित मंनन्देहि देहि स्वाहा

प्रत्येक ओळीतील बारावे अक्षर

अंनपूर्णे सदापूर्णे शंकर प्राणवल्लभे ज्ञानवैराग्य सिद्धार्थ्यं भिक्षांदेहिच पार्वति

अशा अद्‌भुत, अलौकिक प्रसादरचना साधकांना उपलब्ध करून देणाऱ्या श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या व त्या त्यांच्या हातून करवून घेणाऱ्या दयाघन दत्तप्रभूंच्या चरणी शतश: सादर प्रणाम.

**संकलन** : सौ. स्नेहा दामले

★★★

# कार्यक्रम वृत्तांत

★ साईध्यान मंदिर - ‘अनिल’ विलेपार्ले इथे सालाबादाप्रमाणे सौ. संगीता धुरू यांचे कीर्तन, मध्यान्ह आरती व महाप्रसादासह श्री साईबाबांचा महासमाधी दिवस म्हणजे दसरा उत्सव साजरा झाला.

★ दि. २ नोव्हेंबर २०१४ रोजी गुरु समर्पण दिन व दि. २ डिसेंबर २०१४ रोजी मंदिर वर्धापनदिनानिमित्त सायंकालीन आरती व प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही दिवशी श्री. अजित कडकडे यांनी आपली गायनसेवा सादर केली. याव्यतिरिक्त २ नोव्हेंबर रोजी श्री. गव्हाणकर, श्री. गांधी व इतर साईभक्तांनीही भजनसंध्या जागविली. सेवानिवृत्तीनंतर कीर्तन शिकण्यास प्रारंभ केलेले श्री. प्रकाश साळवी यांनीही त्यांची पहिली कीर्तनसेवा श्रीबाबांच्या चरणी त्या दिवशी रुजू केली.